श्लोक ॥ ऋद्धंकिंचित्समादायक्षुल्लकंजलमेववा ॥ २४ ॥ योदत्तेनियमेनासौतस्मेदत्तेजगत्त्रयं ॥ टी० ॥ र

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

त्नमाणिक्यादिउंचवस्तु ॥ अथवाक्षुल्लकजलअस्तु ॥ नियमेंदेतांशिवहासमस्तु ॥ तयात्रैलोक्यदेंतसे ॥ ८५ ॥
त्यांतहीउत्तममध्यमकनिष्ट ॥ प्रकारअसतीतेऐकास्पष्ट ॥ तैसेंचिफलहीउत्तमनिकृष्ट ॥ अधिकारासारिखें ॥ ८६ ॥
उत्तमाचाकैसाप्रकार ॥ तोचिऐकाहोतत्पर ॥ शिवरूपामार्जीचराचर ॥ कींचराचरींशिव ॥ ८७ ॥ ऐसेंहेंऐतेंचि
असतां ॥ मीपणाचीतोमिथ्यावार्ता ॥ तेथेंकोणदाताकोणघेता ॥ मीपणेंवीण ॥ ८८ ॥ ऐशीबुद्धिहेदृढअसे ॥ हातां
पडलेंतेंदेतसे ॥ कोणीदेतांहीघेतसे ॥ परीअभिमानेंनाहीं ॥ ८९ ॥ हाउंचहापदार्थसान ॥ ऐसेंकदानकल्पीमन ॥
अदेयअग्राह्यपदार्थंकवण ॥ कींहेंद्यावेंनद्यावें ॥ ९० ॥ त्रैलोक्यींचीसंपत्तिजरीप्राप्त ॥ तरीहर्षेनाज्याचेंचित्त ॥ को
णीबलात्कारेंहरूननेत ॥ तरीखेदचीनाहीं ॥ ९१ ॥ अथवासत्पात्रींदानदिधलें ॥ परीकल्पीनाम्यांपुण्यकेलें ॥ मगआ
लेंअथवागेलें ॥ शिवामाजी ॥ ९२ ॥ जैसेंपात्रभागीरथीचें ॥ एकादेस्थळींउदकसांचे ॥ तेंओहटूनिजातांढीगवाळू
चे ॥ पडतीआपोआप ॥ ९३ ॥ परींभागीरथीशीखंतीनसे ॥ तेवींजीवन्मुक्ताचीक्रीडाहोतसे ॥ हेंदेखोनिशिवहीदेत
से ॥ समष्टितादात्म्यदृढ ॥ ९४ ॥ आतांमध्यमाचेंसमर्पण ॥ कांहींएकबोलिजेलक्षण ॥ आणितयाप्रतित्रैलोक्यदान॥
शिवकैसाकरी ॥ ९५ ॥ अवघाशिवचीहाबोधझाला ॥ मगजोजोपदार्थदृष्टीसआला ॥ तोतोअर्पणकरूंलागला ॥ शिवा
माजी ॥ ९६ ॥ छत्रेंचामरेंसिंव्हासनें ॥ गजतुरंगसुखासनें ॥ अथवासुवर्णादिनानारत्नें ॥ दृष्टीपडतांचिसमर्पी ॥
९७ ॥ अथवाक्षुल्लकजळफूल ॥ फळेंशुष्ककींरसाळ ॥ नियमेंचिअर्पीसकळ ॥ न्यूनाधिकभावनहोतां ॥ ९८ ॥ तया
वरीशिवसंतोषोनी ॥ प्रवर्ततसेत्रैलोक्यदानीं ॥ तोआवडताहोयसर्वांलागुनी ॥ कींप्राणचीहात्रैलोक्याचा ॥ ९९ ॥ ॥१०॥
आतांकनिष्टअधिकारी ॥ तोहीअदेयपरीदानकरी ॥ परीसर्वदांस्मरतसेअंतरीं ॥ अमुकदिधलेंह्मणोनि ॥ ३०० ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अमूल्यरत्नादिकअर्पी ॥ अथवाक्षुल्लकजलहीसमर्पी ॥ आणिमनींभावहीकल्पी ॥ कींशरीरतेंहीदेईन ॥ १ ॥ स्त्रीपुत्र आणिराज्यादि ॥ कोणीमागतांनह्मणेंनेदी ॥ दिधल्यावरीप्रवर्तेखेदीं ॥ ऐसेंहीनव्हे ॥ २ ॥ परीपुण्याभिमानउरला तेणेंमागुतींजन्माशिआला ॥ तोत्रैलोक्यपदींचाराजाझाला ॥ शिवप्रसादेंकरूनी ॥ ३ ॥ तेथेंकोणींकरीलकल्पना॥ कींसानुकूलअसतांप्रवर्तेदाना ॥ तरीशिवभक्तिदेवहीना ॥ घडेकैशी ॥ ४॥ राजयानेंराज्यदिधलें ॥ कींकंगालानेंसुडकेंसमर्पिलें ॥ परीदोन्हीसमानझाले ॥ शिवालागीं ॥ ५ ॥ दृष्टीनपडेकदारत्ना ॥ आणिजळहीद्यावयामिळेना ॥ तेणेंकैसेंप्रवर्तावेंपूजना ॥ तेंचिऐकाश्लोकीं ॥ ६ ॥ श्लोक ॥ तत्राप्यशक्तोनियमान्नमस्कारंप्रदक्षिणां ॥ २५ ॥ यःकरोतिमहेशस्यतस्मैतुष्टोभवेच्छिवः ॥ टी० ॥ दानाशीहीअशक्तजरी ॥ मौनेंनमस्कारप्रदक्षिणाकरी ॥ तयावरीहीमदनारि ॥ संतोषपावे ॥ ७ ॥ देवदानवमानव ॥ पशुपक्ष्यादिगोअश्व ॥ स्थावरजंगमादिसर्व ॥ शिवरूपेंवंदी ॥ ८ ॥ कन्यापुत्रकलत्रपाहे ॥ उत्तमाधमह्मणोनलाहे ॥ ह्मणेहेंतोशिवरूपआहे ॥ यास्तवलोळेचरणीं ॥ ९ ॥ तैसाचिप्रदक्षिणाकरी ॥ शिवरूपपाहेचराचरीं ॥ वंदनभक्तिहेनिर्द्धारी ॥ बोलिलीअसे ॥ १० ॥ वंद्यतेंचिवंदावें ॥ निंद्यतेंपरतेंसारावें ॥ तयाशीकैसेरीतीनेंसंभवे ॥ अन्यभक्तितेऐका ॥ ११ ॥ श्लोक ॥ प्रदक्षिणास्वशक्तोऽपियःस्वांतेचिंतयेच्छिवं॥ २६ ॥ गच्छन्समुपविष्टोवातस्याभीष्टंप्रयच्छति ॥ टी० ॥ नमनप्रदक्षिणाजरीनकरी ॥ चालतांअथवाबैसतांनिर्धारी ॥ शिवरूपजोचिंतीअंतरीं ॥ तयाइच्छीतशिवदेतो ॥ १२ ॥ जेंजेंदिसेतोतोशिव ॥ तेथेंनकल्पीरूपनांव ॥ हामनींआवडीचास्वभाव ॥ देखिल्याठायांसोंके ॥ १३ ॥ बैसतांकींचालतां ॥ पदार्थमात्रनुद्भवेचित्ता ॥ शिवरूपेंचिहोयआठविता ॥ निदिध्यासरूपें ॥ १४ ॥ अभीष्टतेंचिज्ञानेंकडून ॥ व्हावेंचित्ताचेंसमाधान ॥ जेथेंसमाधिउत्थान ॥ नसेकदा ॥ १५ ॥ शिवहोऊनि

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कृपावंत ॥ ऐसेंअभीष्टतयांदेत ॥ मुख्यभावार्थाचेअसेंप्रीत सदाशिवाशी ॥ १६ ॥ श्लोक ॥ चंदनंबिल्वकाष्ठस्यपुष्पा
णिवनजान्यपि ॥ ॥ २७ ॥ फलानितादृशान्येवयस्यप्रीतिकराणिवै ॥ टी० ॥ पदार्थनह्मणेमोठासान ॥ बिल्वकाष्ठ
पुष्पेंचंदन ॥ वनांतीलफळमूळजाण ॥ शिवाप्रीतिकरहोती ॥ १७ ॥ जेआपुलेआपणउगवले ॥ वृक्षफळमूळदाटले ॥
तेंवन्यजऐसेंबोलिलें ॥ ईशसृष्टरूपी ॥ १८ ॥ पृथिवीअवधीलिंगाकार ॥ सकळवृक्षादिपूजाप्रकार ॥ मनींकल्पूनशि
वसुंदर ॥ पूजिलाऐसापहातसे ॥ १९ ॥ ऐशीमानसपूजाजेहोणें ॥ शिवाशीआवडताहोयतेणें ॥ तरीहेंअतिसुल
भकरणें ॥ असेसाधकां ॥ ३२० ॥ श्लोक ॥ दुष्करंतस्यसेवायांकिमस्तिभुवनत्रये ॥ २८ ॥ टी० ॥ ऐशीसहजसेवाशि
वाची ॥ भुवनत्रयींदुष्करताकैंची ॥ एकभावनामात्रमनाची ॥ सदृढपाहिजे ॥ २१ ॥ दिसेलतेंकल्पूनवाहावें ॥ आवडे
तेंआठवूनसमर्पावें ॥ येथेंदुःसंपाद्यअसावे ॥ पदार्थमात्रकवण ॥ २२ ॥ येथेंनलगेकींबहुधन ॥ अथवानकोशरीरा
चाशीण ॥ सहजपूजाघडेध्यान ॥ जेंप्रीतिकरशिवा ॥ २३ ॥ सहजभावार्थेंजेआवडती ॥ तैशीसायासेंनुपजेप्रीति ॥
हेंचिबोलिजेयथानिगुती ॥ एकाश्लोकेंकडोनी ॥ २४ ॥ श्लोक ॥ वन्येषुयादृशीप्रीतिर्वर्ततेपरमेशितुः ॥ उत्तमेष्वपिना
स्त्येवतादृशीग्रामजेष्वपि ॥ २९ ॥ टी० ॥ पूर्णकामशिवाप्रति ॥ वनफळमूळादिजैसेंआवडती ॥ तेवींग्रामजउत्तमनाव
डती ॥ जीवेंकेलेंते ॥ २५ ॥ सदाशिवाप्रियआदर ॥ भावार्थेंनह्मणेअल्पफार ॥ वन्यजग्रामजपदार्थमात्र ॥ भावें
वीणअप्रिय ॥ २६ ॥ नानारत्नेंअर्पिलीं ॥ अथवाअन्नदानेंसमर्पिलीं ॥ आणिमनींफलाशाकल्पिली ॥ तरीतेंहीव्य
र्थ ॥ २७ ॥ फलाशेवीणकवणाशी ॥ करणेंचिनाहींसायासीं ॥ जेंजेंकरणेंतेंलौकिकासी ॥ रक्षूनकरणेंदांभिकत्वें ॥ २८ ॥
व्याहीजांवईपाहुणेआले ॥ त्यासवेंग्रामस्थबोलाविले ॥ त्यामध्येंपारणेंफेडिलें ॥ व्यंकटेशाचें ॥ २९ ॥ कांहींदेवाचा

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

होतानवस ॥ त्यांतपोराचेंकेलेंबारसें ॥ ऐसेंअसोनबोलेसायासें ॥ ह्मणेम्यांसंतर्पणकेलें ॥ ३० ॥ तयामध्येंएखादा अतिथ ॥ भोजनकरूनियांजात ॥ तेणेंसंतोषेनाचित्त ॥ तेव्हांफलतेंकैचें ॥ ३१ ॥ तस्मात्कांहींसमर्पितां ॥ अनाद रेंहोयअप्रियता ॥ अथवाभावेंविणआदरहीकरितां ॥ व्यर्थचिजाय ॥ ३२ ॥ मैंदेंजैसेंसत्रघातलें ॥ आलियाशींआ दरेंपूजिलें ॥ शेवटींलुटोनियांघेतलें ॥ जैशीयापरी ॥ ३३ ॥ तेवींतारतम्यकरीसांग ॥ संपादीजोआलाप्रसंग ॥ प रीफलाशेचाअंतरींरोग ॥ तेणेंशिवसंतोषेना ॥ ३४ ॥ यास्तवग्रामजविषयनावडती ॥ आवडेतरीतैशीनुपजेप्रीति जिवींभावार्थेवनफळेंअर्पिती ॥ तींहोतीअतिप्रिय ॥ ३५ ॥ दिवसपंध्रावनफलावेंचिलें ॥ पारणेंसोडावेंहेंमनींधरिलें ॥ इ तुक्यामध्येंअतिथीआले ॥ ह्मणतीआह्माअन्नदेई ॥ ३६ ॥ आपणतरीउपवासीमरे ॥ ह्मणेआश्रमायेणेंकेलेंशंकरें ॥ यास्तवधांवोनियांसामोरें ॥ चरणींलोळेगडबडां ॥ ३७ ॥ ह्मणोनबैसवीआदरें ॥ पूजाकरीहर्षेनअंतरें ॥ फळमूळेंअ र्पोनिसमग्रें ॥ अतिथातृप्तकरी ॥ ३८ ॥ ऐशियाआदरेंजेंसमर्पण ॥ तेणेंसंतोषेउमारमण ॥ ह्मणेंयाचियाउपका राउत्तीर्ण ॥ मीकैसाहोऊं ॥ ३९ ॥ याउपकाराचेंओझेंमजला ॥ नसोसवेबहुभारझाला ॥ यास्तवनिजकैवल्यतयाला ॥ ज्ञानद्वारादेतसे ॥ ४० ॥ तस्मात्पूर्वीलअनधिकारी ॥ तेहीभावार्थेंहोतीअधिकारी ॥ तयांगीतार्थहोयझडकरी ॥ गु रुमुखेंसुलभ ॥ ४१ ॥ एवंझालेंजेंनिरूपण ॥ ध्वनितेंशिवरूपाचेंकेलेंकथन ॥ त्यांतपूजाप्रकारविधान ॥ तेंहीसांगि तलें ॥ ४२ ॥ आणिकैसेंशिवाचेंकृपालुत्व ॥ कींभक्ताशिअर्पीआपलेंनिजत्व ॥ शेखींअदेयजेंगुरुत्व ॥ तेंहीसमर्पी ॥ ४३ ॥ ऐसादेवदूजाकोण ॥ कींनिजपददेदासांलागून ॥ हेंगुरुत्वाचेंभूषण ॥ गुरूशीचसाजे ॥ ४४ ॥ ऐसादेवहाअ व्हेरिती ॥ अन्यदेवांजेभजोंजाती ॥ तयांमंदमतियांचीखंती ॥ अंतरींथोरवाटे ॥ ४५ ॥ श्लो० ॥ तंत्यक्त्वाताद

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥वे. टी.॥ शंदेवंयःसेवेतान्यदेवतां ॥ सहिभागीरथींत्यक्त्वाकांक्षतेमृगतृष्णिकां ॥ ३० ॥ टी० ॥ ऐसाथोरलादेवहाटाकून ॥ जे ॥ अ०॥
॥ १२ ॥ सेवितीअन्यदेवांलागून ॥ जैसेंभागीरथीतेंअव्हेरून ॥ मृगजळाइच्छिती ॥ ४६ ॥ मुख्ययावेदांतविषयाशी ॥ गुरू ॥ १ ॥
चिदेवसच्छिष्याशी ॥ तोचिशिवहानिश्चयेंशी ॥ साकारनिराकाररूपें ॥ ४७ ॥ सर्वदेवज्याचेअंगभूत ॥ आणिभूतभौ
तिकसमस्त ॥ ॥ एवंसर्वपणेंशीविराजत ॥ शिवगुरुत्वएकलें ॥ ४८ ॥ ऐसाएकपणाहासांडिती ॥ भिन्नभिन्नदेवाशीकल्पि
ती ॥ हाइतुकादेवह्मणोनिभजती ॥ किंचिज्ञजीव ॥ ४९ ॥ एकह्मणतीविष्णुथोर ॥ तोचिपूज्यअपूज्येयर ॥ एकरुद्ररूपें
शंकर ॥ अन्यत्यागेंभजती ॥ ५० ॥ एकपूजितिचतुरानना ॥ एकसेवितीगजवदना ॥ एकतेसूर्यनारायणा ॥ प्रत्यक्ष
भाविती ॥ ५१ ॥ एकह्मणतीहाजलधर ॥ स्वाधीनज्याचेतोपूजावाइंद्र ॥ एकह्मणतीशीतलकरतोचंद्र ॥ सर्वजनांशी
॥ ५२ ॥ एकह्मणतीअंतींदंडकर्त्ता ॥ तोयमधर्मभजावातत्त्वतां ॥ एकह्मणतीकुबेरपूजितां ॥ बहुधनदेईल ॥ ५३ ॥
एकम्हणतीपूजितांवरुणा ॥ सर्वरसदेईलआपणा ॥ एकम्हणतीप्रसन्नकरावेंवामना ॥ इंद्रपदत्याआधिन ॥ ५४ ॥
एकम्हणतीवायुमुख्यप्राण ॥ एकम्हणतीसाह्यकरावाअग्न ॥ एकम्हणतीअवतारकृष्ण ॥ एकरामाशीभजती ॥ ५५ ॥
मत्स्यकूर्मवराहमूर्ती ॥ नृसिंहभार्गवबौद्धाभजती ॥ एकम्हणतीकलंकीजीमूर्ती ॥ पुढेंहोणारतोभजावा ॥ ५६ ॥ हेंअ
सोएकम्हणती ॥ पृथिवीशीजेएकभावेंपूजिती ॥ तेसर्वफळाशीलाहती ॥ यशकीर्तीप्रताप ॥ ५७ ॥ ऐसेंअन्यदेवांचें
भजन ॥ जैसेंमृगजलांचेंपान ॥ तेणेंकधींहीतृषाहरण ॥ नव्हेकवणा ॥ ५८ ॥ तेवींअन्यदेवअन्यलेंभजतां ॥ कैवल्य
मुक्तिनव्हेतत्त्वतां ॥ ऐसेंऐकूनशौनकसूता ॥ प्रश्नकरितेझाले ॥ ५९ ॥ कोण्याहिदेवाशिनमस्कारिलें ॥ तेंएकशंकराशीपाव ॥१२॥
लें ॥ आकाशांतूनपाणीजेंपडलें ॥ तेंसमुद्रींमिळे ॥ ६० ॥ संमतिश्लोक ॥ आकाशात्पतितंतोयंयथागच्छातिसागरं ॥ स

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वेंदेवमस्कारंकेशवंप्रतिगच्छति ॥ १ ॥ वाक्यहें ऐसें असतां ॥ येथें कांदिसेविषमता ॥ अन्यदेवांशींभजतां ॥ मुख्यदे
वानपवेकां ॥ ६१ ॥ ऐसेंअशंकेचेंउत्तर ॥ सूतदेताझालासुंदर ॥ येथेंसाधकेंनिरुत्तर ॥ होऊनऐकावें ॥ ६२ ॥ हास
र्वपणाकवणावरीउठिला ॥ तोंदेवपाहिजेओळखिला ॥ मगतोतृणाशीजरीभजिन्नला ॥ तेमुख्यदेवापावे ॥ ६३ ॥ वि
ष्णुअथवाशंकर ॥ अथवाअन्यदेवांचेप्रकार ॥ परीभावनेशीसर्वेश्वर ॥ एकाचिऐसेंपाहिजे ॥ ६४ ॥ ऐसेंनसतांभि
न्नाभिन्न ॥ उगेंचिकल्पितीथोरसान ॥ एकदेशीभजतांजाण ॥ तेणेंसर्वसिद्धिकेंची ॥ ६५ ॥ उष्णनलागावेंअणुमात्र ॥
यास्तवजनकरितिमिंदिर ॥ त्यांतीलकिलचघेतांशिरावर ॥ छायासुखकैचें ॥ ६६ ॥ तैसेंसमष्टिरूपदेवासांडूनी ॥ एक
देशीदेवाभजतीमनीं ॥ कैवल्यमुक्तीचेंफळत्यालागूनी ॥ नव्हेकदां ॥ ६७ ॥ येथेंहीशंकाकरितिलथोर ॥ कींधाकुटेदेव
असोतयेर ॥ परीमोठेविष्णुशंकर ॥ त्यांचेभजनेंफळलाहिजे ॥ ६८ ॥ सानह्मणोनिकिलचसांडिली ॥ मोठीलग
शिरींघेतली ॥ तेणेंछायेचीविश्रांतीझाली ॥ हेंतोनघडे ॥ ६९ ॥ तस्मात्अवघाएकदेवनकळतां ॥ एकदेशीविष्णुशि
वातेंभजतां ॥ मुक्तीचेंफळनयेहातां ॥ हेंसत्यसत्यजाणावें ॥ ७० ॥ यास्तवमुमुक्षूसीनिरवणें ॥ कींसर्वएकात्मत्वेंपाहणें ॥
जैसेंसर्वालंकारामाजीसोनें ॥ एकचिअसे ॥ ७१ ॥ एकदेशित्वेंजेभजती ॥ तेतिन्हीमुक्तीजरीलाहती ॥ परीतेमुख्यफलां
आंचवती ॥ हेंविचारोतसाधक ॥ ७२ ॥ जयाऐक्यभक्तीचीचाड ॥ तेणेंअन्याचीनधरावीभीड ॥ एकलाशिवगुरूघबा
ड ॥ सर्वींसर्वपणीं ॥ ७३ ॥ ऐसेंअसतांजेकरंटे ॥ सत्यमानितीअसतांखोटें ॥ पडतीजाऊनकडकडाटें ॥ संसृतीमा
जी ॥ ७४ ॥ हेंअसोअन्यदेवांभजती ॥ तेकांहींविषयफळेंलाहती ॥ याहीहुनजेमंदमति ॥ भजतीकैसेऐका ॥ ७५ ॥
नानाक्षेत्रींनानाप्रतिमा ॥ तेथीलथोरऐकोनिमहिमा ॥ जाऊनपूजितीधरूनप्रेमा ॥ मुख्यशिवरूपनेणोनी ॥ ७६ ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

बदरीनारायणबदरीकेदार ॥ काशीमाजीविश्वेश्वर ॥ उज्जयिनीचामहाकालेश्वर ॥ घृष्णेश्वरवेरुळीं ॥ ७७ ॥ गं
गाउगमींत्र्यंबकेश्वर ॥ वैद्यनाथभीमाशंकर ॥ नागनाथॲंकारेश्वर ॥ श्रीशैलमल्लिकार्जुन ॥ ७८ ॥ अयोध्याद्वा
रकामथुरापुरी ॥ तेथेंहीदेवशीलाधारी ॥ ऐशींउदंडक्षेत्रेंपृथिवीवरी ॥ बोलेऐसाकवण ॥ ७९ ॥ व्यंकटेशमल्लार
भैरव ॥ औंढ्याजगन्नाथविठोबादेव ॥ झोटिंगवेताळदेवीदेव ॥ नवचेबोलिलें ॥ ८० ॥ हेप्रत्यक्षघडोनिकेले ॥
ब्राह्मणींवेदमंत्रेंप्रतिष्ठिले ॥ ऐसेंजाणुनहीभजोंलागले ॥ ह्मणतीचुकतांदेवकोपती ॥ ८१ ॥ जोअनंतब्रह्मांडेंभरोनि
उरला ॥ तोएकेसंबळींतसांठविला ॥ बळेंचिबांधोनियांठेविला ॥ गांठींदेवोनि ॥ ८२ ॥ सर्व्वपृथिविअसतांलिंगाका
र ॥ मातीचींलिंगेंकरितीसाचार ॥ बाणशालिग्रामअपार ॥ देव्हारियांपूजिती ॥ ८३ ॥ एकगुंडेवेंचूनिआणिती ॥
चिरगुटांतघालूनिदंडींबांधिती ॥ कोणाच्यादृष्टीपडतांह्मणती ॥ आह्माप्रायश्चित्तपडे ॥ ८४ ॥ कवणेकाळींदेवहरप
ला ॥ आतांअन्नघेणेंनाहींमजला ॥ निग्रहकरूनिप्राणदिधला ॥ तरीतेथेंदेवकैंचा ॥ ८५ ॥ एकदोराशीगांठीदेउनी ॥
पूजितातीदंडींबांधूनी ॥ एकशालिग्रामसुखींठेवूनी ॥ पूजितीआदरें ॥ ८६ ॥ एकगाद्याचांदेवआंथरिती ॥ पक्ष्याचीं
अंडींवरतीबांधिती ॥ हाचिदेवआमुचाह्मणती ॥ अवयवहीननिराकार ॥ ८७ ॥ असोजितुकेदेवतितुक्यामूर्ति ॥
अचळचंचळलेंस्थापिती ॥ ऐसेंसांगावेंतेंकिती ॥ अंतनलगे ॥ ८८ ॥ एकदेवअन्नखातो ॥ एकदेवसुखेंडोलतो ॥ ए
कह्मणतीदेवबोंबलतो ॥ कांहींसंकटपडतां ॥ ८९ ॥ एकेदेवेंदरवडापीटिला ॥ एकह्मणतीदेवहरपला ॥ उपोषणकरि
तांमाघारांआला ॥ भक्तिसाठीं ॥ ३९० ॥ असोजयाशीकरणेंहित ॥ तेणेंत्यागावेंहेंसमस्त ॥ धरुनिसाधूचीसंगत ॥ ॥ १३ ॥
मुख्यदेवतोशोधावा ॥ ९१ ॥ मृगजळपानेंतृषानहरे ॥ तैसेदेवहेपूजितांसारे ॥ एकदेवसाचोकारें ॥ संतांवीनसांप

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

डेना ॥ ९२ ॥ हेंअसोअवघाहादेव ॥ जरीऐकूनठेविलाभाव ॥ परीआपुलीअसतांवेगळीव ॥ भक्तिनघडे ॥९३ ॥ तेणेंहीभागीरथीत्यागून ॥ मृगजळाचेंकेलेंपान ॥ मापाषाणदेवाचेंपूजन ॥ निरर्थककांनह्मणावें ॥ ९४ ॥ अस्ति भातिप्रियनोळखितां ॥ शिवरूपपाहेजगासमस्ता ॥ मुख्यफळतयाचेंहीहातां ॥ नयेकल्पांतीं ॥ ९५ ॥ तेंहीअसो सच्चिद्रूप ॥ त्याहुनभिन्नउरेआपणअल्प ॥ तेणेंहीमृगजळाचेंमाप ॥ पदरींघेतलें ॥ ९६ ॥ मगअन्यअन्यत्वेंजेपा हती ॥ तयांमृगजलह्मणतांकायभीति ॥ असोतयामंदमतियांचोखंती ॥ एकाश्लोकेंबोलिजे ॥ ९७ ॥ श्लो० ॥ किंतुयस्यास्तिदुरितंकोटिजन्मसुसंचितं ॥ तस्यप्रकाशतेनायमर्थोमोहांधचेतसः ॥ ३१ ॥ टी० ॥ हाउघडअपरोक्षअ र्थऐसा ॥ मोह अंधाशीनकळेकैसा ॥ कोटिजन्माचेपापाचाफांसा ॥ पडिलाअसेजयाशी ॥ ९८ ॥ अर्थह्मणिजेमागें बोलिलें ॥ जेंप्रत्यक्षशिवाचेंरूपकेलें ॥ दुजेवीनएकलेंसंचलें ॥ अस्तिभातिप्रियात्मक ॥ ९९ ॥ जीवहीत्याहूननसेभिन्न ॥ तस्मा च्छिवरूपचिआपण ॥ हेंपुढेंअसेबोलणें ॥ प्रसंगानुसार ॥ ४०० ॥ तस्मात्प्रत्यक्षऐसाअर्थ ॥ कींआपणचिअंगेंशिवसम र्थ ॥ आपणावीनदुजापदार्थ ॥ किमपिनाहीं ॥ १ ॥ ऐसेंअसतांयाजनांशीं ॥ झांपडीनेत्रांपडलीकैशी ॥ मोहांधकारचित्ता शी ॥ सदृढझाला ॥ २ ॥ तस्मात्अनंतकोटीचेंजन्मार्जित ॥ पापाचेंझालेंसंचित ॥ यास्तवप्रगटार्थनप्रकाशत ॥ शास्त्रेंसांगत असतांही ॥ ३ ॥ तयापापाचेंवर्णन ॥ कांहींएककरूंगणन ॥ जेंजीवानवचेउल्लंघन ॥ कल्पांतीही ॥ ४ ॥ जीवहाशिवरूपचि असतां ॥ अज्ञानेंआलीजीतत्वता ॥ तेणेंलागलीदेह अहंता ॥ मीदेहकिंचिज्ञ ॥ ५ ॥ आहेतेंशिवत्वगेलें ॥ नाहींतेंजीवत्वउद्भ वलें ॥ ऐसेंअज्ञानमायेनेंकेलें ॥ एकाचेंएक ॥ ६ ॥ असोमीदेहस्फूर्तिहोतां ॥ क्षणेंब्रह्महत्याकोटिशता ॥ आणिगोहत्या दिअनंता ॥ सर्वहीपापेंघडती ॥ ७ ॥ ऐसेअनंतजन्मगेले ॥ मीदेहम्हणतांचिमेले ॥ तयापापाचेढीगझाले ॥ कितीहिन

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कळती ॥ ८ ॥ येणेंरीतिमागीलसंचित ॥ पुढेंमीदेहह्मणोनिवर्त्तत ॥ ऐसेजेमोहांधकारेंव्याप्त ॥ त्यांशीअर्थप्रकाशेकैसा
॥ ९ ॥ आपणअपरोक्षशिवनेणती ॥ अथवापरोक्षत्वेंहीनजाणती ॥ उगेचिपाषाणादिपुजोंजाती ॥ देवदेवह्मणोनि
॥ १० ॥ रज्जूवरीसर्पभाविला ॥ तोजैसादुःखदझाला ॥ अथवाहारजरीकाल्पिला ॥ तोहीसुखदेकोठोनि ॥ ११ ॥
मुळींअसज्जडदुःखात्मक ॥ नामरूपहेंनिश्चयात्मक ॥ येथेंसुखहीकल्पितांअवश्यक ॥ दुःखचिहोईल ॥ १२ ॥ असो
आम्हाअज्ञानाशी ॥ काजनसेबोलावयाशी ॥ जेजेकर्मेंकरितीजैशीं ॥ फळेंहीपावतीतैशीं ॥ १३ ॥ परीमुमुक्षुअथवासा
धक ॥ जेमोक्षमार्गींचेपाईक ॥ तयांशिप्रार्थितोंअवश्यक ॥ महानेटेंगर्जोनि ॥ १४ ॥ कींनामरूपअवघेंसांडावें ॥ जें
कामायिकस्वभावें ॥ शिवत्त्वशिवरूपेंपहावें ॥ अभिन्नपणें ॥ १५ ॥ जीवेशऐक्यअर्थाप्रति ॥ गर्जतअसतीअंनतश्रुति॥
तस्मात्माझीकल्पितयुक्ति ॥ नमानासहसा ॥ १६ ॥ येथेंजोअविश्वासमानी ॥ तयाचुकेनाजन्मयोनि ॥ विश्वासधरी
जोअर्थालागुनी ॥ तोयेचिदेहींमुक्त ॥ १७ ॥ येथेंकोणतागासायास ॥ कांहींदुर्घटनव्हेअभ्यास ॥ एकसदृढ
निदिध्यास ॥ लागलापाहिजे ॥ १८ ॥ श्लोक ॥ नकालनियमोयत्रनदेशस्यस्थलस्यच ॥ यत्रास्यचित्तंरमतेत
स्यध्यानेनकेवलम् ॥ ३२ ॥ टी० ॥ नलगेकालदेशआसन ॥ नियमअथवाएकाग्रमन ॥ जैसेंजैसेंचित्ताचेंरंजन ॥
तेवींकेवलध्यानकरावें ॥ १९ ॥ स्नानसंध्याअनुष्ठान ॥ जपअथवायज्ञहवन ॥ येथेंपाहिजेनियमन ॥ कालदे
शादि ॥ २० ॥ अमुककार्याशीअमुककाल ॥ अमुकदेशअमुकस्थळ ॥ पूर्वोत्तरदिशाहीकेवळ ॥ तेथेंएकांतींबै
सावें ॥ २१ ॥ तैसेंध्यानाशीनलगे ॥ बैसेकींव्यवहारींवागे ॥ ध्येयींमनाचेंअनुसंधानलागे ॥ यानांवध्यान ॥ २२ ॥
प्रातःकाळींचध्यानकरावें ॥ आणिसर्वदांकांविस्मरणपडावें ॥ यास्तवकाळनेमनसंभवे ॥ सहजध्यानाशी ॥ २३ ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अमुकदेशीं अमुकस्थळीं असतां ॥ तेथें स्थिरत्व करावों चित्ता ॥ ऐसा निर्बंधन कोतत्ववतां ॥ अनुसंधानमात्र रहावें ॥ २४ ॥
येथें सामग्रीतरी कासया ॥ कीं अमुक पाहिजे ध्यान उपाया ॥ नातरी समान असावी काया ॥ अथवा नेत्र झांकणें नको ॥ २५ ॥
दृष्टी पडेल तें पहावें ॥ उठती शद्ब तें ऐकावे ॥ परंतु नारूप जाणोन त्यागावें ॥ ध्यावें अस्ति भाति प्रियत्वा ॥ २६ ॥ जा
गृति झालिया पासून ॥ झोंप येई ल परतोन ॥ तावत्काल राखावें स्मरण ॥ निदिध्यासरूपें ॥ २७ ॥ यावत्काल शरीरीं प्राण ॥
तों काल न सोडीं ध्यान ॥ ऐसा निश्चय मनीं करून ॥ योषा जारापरी ध्यावें ॥ २८ ॥ जारस्त्री चा घरधंदा ॥ यथायुक्त होय सदां ॥
मन लागे जाराचे छंदा ॥ रतिसुखरूपें ॥ २९ ॥ तैसें सर्व व्यवहार करितां ॥ शिवरूप आठवे चित्ता ॥ येथें श्रम तो केउता ॥ साधकाशी
होय ॥ ३० ॥ आतां शिवरूप मानसें ॥ स्वात्मत्वें ध्यावें कैसें ॥ तेंचि निरूपण कांहींसें ॥ श्लोकार्द्धे करूं ॥ ३१ ॥ श्लोकार्द्ध ॥ आ
त्मत्वेन शिवस्यासौ शिवसायुज्यमाप्नुयात् ॥ टी० ॥ सच्चिदानंद शिव ब्रह्म ॥ तो मी निजांगें आत्माराम ॥ ऐशिया ध्यासें पुरु
षोत्तम ॥ पावेल अढळु ॥ ३२ ॥ शिवरूपीं अज्ञानवशें ॥ जगादि हें उद्भवलें असे ॥ मी देह हें ही धरिलें मानसें ॥ ब्रह्म निजांगें अ
सोनि ॥ ३३ ॥ कोणी एक पुरुष निजेला ॥ दिव्यपलंगीं एकला ॥ तो स्वप्नीं अंत्यज झाला ॥ भीक मागूं लागे ॥ ३४ ॥ तैसा ब्र
ह्मचि हा असोन ॥ विस्मरणें होयें हें अज्ञान ॥ तेंचि जाहलें कारण ॥ देहद्वयाशी ॥ ३५ ॥ निद्रिस्था विसरोन अंतरीं ॥ भी
क मागे दारोदारीं ॥ तेथें सुखदुःखें शिणे भारी ॥ आणि भावी मी करंटा ॥ ३६ ॥ तैसा मी ब्रह्म तरी नव्हें ॥ तरी मी कोण गा
ऐसें पाहे ॥ तंव पुढें देखिला देह ॥ त्याशींच मी म्हणों लागे ॥ ३७ ॥ मी म्हणतां उठली स्फूर्ती ॥ सप्तदश प्रकार तयेचे होती ॥
तयाशी सूक्ष्मदेह म्हणती ॥ जेणें स्थूल निर्मिला ॥ ३८ ॥ एक चंचलत्व विभागलें ॥ तेंचि पंचधा प्राण नांव पावलें ॥ त्यांत
जाणते पण स्फुरलें ॥ तें ही दो प्रकारीं ॥ ३९ ॥ होय नव्हे संशयात्मक ॥ हें चि मनाचें रूपक ॥ निश्चय चि हा करी अमुक ॥ ते

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

चिबुद्धि ॥ ४० ॥ अंतरींमीमीजेंस्फुरें ॥ तेचिबुद्धिजाणावीविचारें ॥ हेंहेंम्हणावयायेबाहेरें ॥ हेंचिरूपमनाचें
॥ ४१ ॥ पंचप्राणाच्यासहवासें ॥ मनोवृत्तिबाहेरयेतसे ॥ तयाचींद्वारेंअसतीदशें ॥ तेचिदशेंद्रियें ॥ ४२ ॥
शब्दादिविषयांजाणती ॥ तयांशींज्ञानेंद्रियेंम्हणती ॥ वचनादिक्रियाजींकरिती ॥ तींचकर्मेंद्रियें ॥ ४३ ॥ ए
वंप्राणआणिदशेंद्रिय ॥ आणीकमनबुद्धिद्वय ॥ यासत्रातत्त्वांचासमुदाय ॥ लिंगदेहबोलिजे ॥ ४४ ॥ लिंगदेहहाचि
किडा ॥ तेणेंस्थूळनिर्मिलाकवडा ॥ त्यांतराहूनियांकोडा ॥ व्यापारकरी ४५ ॥ मंदिरकरूंहेंमनींधरितां ॥ आकारु
अंतरींजोहोता ॥ तोचिप्रगटेहातेंकरितां ॥ स्पष्टविषयदृष्टीचा ॥ ४६ ॥ तेंवीचहेतूसूक्ष्मदेहाचा ॥ गुप्तहोताभासआभा
साचा ॥ प्रगटतांआकारुस्थूलाचा ॥ स्पष्टदिसूंलागे ॥ ४७ ॥ तस्मात्हेंकल्पनेचेंनिर्मित ॥ भिन्नदेहद्वयदिसूंलागत ॥ या
दोहींचेंबीजविख्यात ॥ जेंनिजरूपनकळणें ॥ ४८ ॥ तयानेंणिवेचाजोअभिमान ॥ धर्त्यासिनांवआलेंप्राज्ञ ॥ तोचिजी
वचंचलींव्यापून ॥ तादात्म्यपावे ॥ ४९ ॥ चंचळअहंतेचीस्फूर्ती ॥ तोचितैजसनामेंविख्याती ॥ पुढेंमीदेहधरितांप्रती
ति ॥ विश्वनामपावला ५० ॥ असोपिंडतादात्म्यामुळें ॥ शुद्धचिजीवत्वाशीपावलें ॥ तेंवीचब्रह्मांडतादात्म्यामुळेंकल्पि
लें ॥ शिवहेंअभिधान ॥ ५१ ॥ भिन्नभिन्नकारणेंसमस्त ॥ तेंचिसमष्टिरूपींअव्याकृत ॥ तयाचेअभिमानेंपावत ॥
रुद्रनामऐसें ॥ ५२ ॥ सर्वांचेसूक्ष्मदेहमेळविजे ॥ तयाशींहिरण्यगर्भबोलिजे ॥ तयाअभिमानेंनांवपाविजे ॥ विष्णुए
सें ॥ ५३ ॥ भिन्नभिन्नजितुकेपिंड ॥ एकत्रकरितांनामब्रह्मांड ॥ तयाचाअभिमानधरीवाड ॥ तोचतुरानन ॥ ५४ ॥ ऐ
सेंपिंडब्रह्मांडकाल्पिलें ॥ एकचिअसतांभिन्नभाविलें ॥ मीइतुकाचिमजशलिागले ॥ जन्ममरणधर्म॥ ५५ ॥ मीनियम्य
तोनियंता ॥ मीभ्राम्यतोभ्रमाविता ॥ मीपापपुण्याचाअसेंकर्ता ॥ तोप्रेरककर्मांचा ॥ ५६ ॥ मजशीसुखदुःखाचेअस

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तीभोग ॥ तोतरीसदांअसेअसंग ॥ एवंकल्पोनियांकेलेविभाग ॥ जीवशिवरूपेंदोन ॥ ५७ ॥ एवंनकळणेंनिजरूपा
चें ॥ हेंचिकारणजन्ममृत्यूचें ॥ याशींझालेंपाहिजेसाचें ॥ यथार्थज्ञान ॥ ५८ ॥ स्वप्नामाजीजोअंत्यजझाला ॥
तेणेंस्मरावेंमीतोनिजेला ॥ तेंवींशिवोहंआपणाला ॥ जीवेंस्मरावें ॥ ५९ ॥ निजेलियास्मरतांचक्षणीं ॥ अंत्यज
पणाचीहानि ॥ तेंवीस्वात्मत्वेंधरितांध्यानीं ॥ जीवशिवरूपहोय ॥ ६० ॥ पिंडहेअस्थिमांसाचे ॥ तेंवीब्रह्मांडपंचभू
तांचें ॥ याउभयांशींआस्तित्वजयाचें ॥ शिवोहंशिवोहं ॥ ६१ ॥ पिंडींअवस्थाजागृति ॥ ब्रह्मांडींअवस्थाउत्पत्ति ॥
उभयसाक्षीस्वयंज्योति ॥ शिवोहंशिवोहं ॥ ६२ ॥ जागृतीचाविश्वाभिमान ॥ तोचिब्रह्मांडींचतुरानन ॥ साक्षीउभयां
विलक्षण ॥ शिवो० ॥ ६३ ॥ स्थूलभोगअसेस्थूलाशीं ॥ भ्रांतीनेंधरिलेंहोतेंत्याशी ॥ भ्रांतिजातांचिअविनाशी ॥
शिवो० ॥ ६४ ॥ पायुइंद्रियहेंपिंडीं ॥ तोचियमधर्मब्रह्मांडीं ॥ याक्रियेशीज्याचीप्रौढी ॥ शिवो० ॥ ६५ ॥ पिंडींउप
स्थभोगीरति ॥ उत्पत्तीकर्ताप्रजापति ॥ उभयांउभवीजयाचीशक्ति ॥ शिवो० ॥ ६६ ॥ पादेंद्रियक्रियागमन ॥ तो
चिब्रह्मांडींवामन ॥ हेजयाचेनिभासमान ॥ शिवो० ॥ ६७ ॥ ग्रहणदानात्मकपाणि ॥ तोचिब्रह्मांडींवज्रपाणि ॥
याशीसत्तास्फुरद्रूपताजयाचेनि ॥ शिवो० ॥ ६८ ॥ परादिकावाचाचारी ॥ तोब्रह्मांडींअग्निनिर्द्धारी ॥ याशब्दार्थरू
पेंजोउभारी ॥ शिवो० ॥ ६९ ॥ घ्राणसुगंधातेंनिवडी ॥ अश्विनीदेवतोब्रह्मांडीं ॥ सत्तास्फुरताज्याचीप्रौढी ॥
शिवो० ॥ ७० ॥ जिव्हारसस्वादघेतसे ॥ ब्रह्मांडींवरुणनामाअसे ॥ जयाचेचिद्रूपेंहेंभासे ॥ शिवो० ॥ ७१ ॥
चक्षुइंद्रियहेंचिपिंडीं ॥ तोचिप्रसिद्धसूर्यब्रम्हांडीं ॥ उभयप्रकाशकजोपरवडी ॥ शिवोहंशिवोहं ॥ ७२ ॥
त्वगेंद्रियस्पर्शानुकारें ॥ ब्रह्मांडींवायुह्मावावरे ॥ याउभयांज्याचेनिज्ञानस्फुरे ॥ शिवोहंशिवोहं ॥ ७३ ॥ श्रोत्रें

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शब्दाशीऐकणें ॥ तेचिब्रम्हांडींदिशाहोणें ॥ हेंजयाचेनिभासमाने ॥ शिवोहं० ॥ ७४ ॥ प्राणापानउदान ॥ व्यानचौथापांचवासमान ॥ हेव्यवहारचालतीजेणें ॥ शिवोहं० ॥ ७५ ॥ संकल्पविकल्पमनाचेंरूप ॥ क्षयवृद्ध्यात्मकतोचिउडुप ॥ ज्याचेप्रकाशेंहेप्रकाशरूप ॥ शिवोहं० ॥ ७६ ॥ बुद्धिनिश्चयाअतिचतुर ॥ तोब्रम्हांडींसावित्रीवर ॥ ययासाक्षीजोचिन्मात्र ॥ शिवोहं० ॥ ७७ ॥ एवंसत्राकलात्मकालिंग ॥ तेणेंचिहिरण्यगर्भसांग ॥ याशीअधिष्ठानजोअसंग ॥ शिवो० ॥ ७८ ॥ स्वप्नावस्थापिंडींउमसे ॥ तेंचिब्रह्मांडींपालनअसे ॥ हाजयावरिभ्रमभासे ॥ शिवो० ॥ ७९ ॥ स्वप्नाचातेजसअभिमानि ॥ तोचिविष्णुचक्रपाणि ॥ हेजयावरीदिसतीदोन्ही ॥ शिवो० ॥ ८० ॥ अज्ञानवशेंकर्त्ताभोक्ता ॥ तेंवीचईशप्रेरकानियंता ॥ याभ्रमाअधिष्ठानतत्त्वतां ॥ शिवो० ॥ ८१ ॥ नकळणेंजेंअज्ञान ॥ तयाशीबोलिजेकारण ॥ जेथेंअव्याकृतभासमान ॥ शिवो० ॥ ८२ ॥ बुद्धीचालयतेसुषुप्ति ॥ ब्रम्हांडींसंहारतयाशीम्हणती ॥ लयसाक्षीजेउरेज्ञप्ति ॥ शिवो० ॥ ८३ ॥ नेणअभिमानतोचिप्राज्ञ ॥ ब्रह्मांडींरुद्रहाआपण ॥ यासीअस्तिभातिप्रियपूर्ण ॥ शिवो० ॥ ८४ ॥ एवंनामरूपामिथ्याभासे ॥ पिंडब्रम्हांडदोन्हीऐसे ॥ यांतसच्चिद्रूपजेंअसे ॥ शिवोहंशिवोहं ॥ ८५ ॥ सर्पाआधिष्ठानदोरी ॥ रजताआधाराशिंपसारी ॥ तेंवीआधिष्ठानरूपनिर्द्धारी ॥ शिवो० ॥ ८६ ॥ एवंस्वात्मत्त्वेंध्यानऐसें ॥ यथामतीबोलिलेंकांहींसें ॥ मुमुक्षुसाधकधरितीलमानसें ॥ तेशिवसायुज्यपावती ॥ ८७ ॥ हेंचितत्त्वाचेंविवेचन ॥ विवेकेंआत्मत्वानिवडणें ॥ हेंचिमनननानेदिध्यासन ॥ ध्यानहीहेंचि ॥ ८८ ॥ एवंअहंस्फूर्तीमुळींउठली ॥ तोचिदेहाकारेंपरिणमली ॥ तेणेंचिसत्यत्वेंबाणली ॥ प्रतीतिजगाची ॥ ८९ ॥ जेवींबहुतशून्येंघालितां ॥ जमेशीनयेतीतत्वतां ॥ पहिल्याशून्याशीफांटाफोडितां ॥ सर्वजमेसआली ॥ ९० ॥ तैसेंजगनामरूपात्मक ॥ उद्भवलेंचि

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नाहींसकळिक ॥ मीदेहस्फुरतांचिएक ॥ सर्वेहीसत्यझालें ॥ ९१ ॥ शून्याशीफांटाजोफुटला ॥ तोमागुतीशून्यांत मेळाविला ॥ येरसर्वशून्येंअसतांजमेला ॥ ठावनाहीं ॥ ९२ ॥ तेवींअहंकाराचीस्फूर्ती ॥ जेथूनहोयउमटती ॥ तेथें चिघालावीमागुती ॥ शिवोहंम्हणोनि ॥ ९३ ॥ अज्ञानेंमीदेहवाटलें ॥ तेंचज्ञानेंमीब्रह्मस्फुरलें ॥ हेंचिजाणावें मागुतींगेलें ॥ जेथीलतेथें ॥ ९४ ॥ मगपूर्ववतजगअसतां ॥ अथवाव्यवहारचालतां ॥ पिंडब्रह्मांडानयेसत्यता ॥ कवणेहीकाळीं ॥ ९५ ॥ अहंब्रह्मजेस्फूर्ती ॥ हेहीलयाजायनिवृत्ति ॥ एकटउरेस्वयंज्योति ॥ शिवचिशिवरूपीं ॥९६॥ एकघटमातींचाकळला ॥ तेव्हांसर्वघटांचाप्रत्ययआला ॥ एकापिंडींचाकळतांमासला ॥ सर्वब्रह्मांडकळलें ॥ ९७ ॥ मृत्तिकेवीणघटांत ॥ कायहोअसेकिंचित ॥ तेवींभौतिकादिपंचभूत ॥ यांतचिद्रूपसारें ॥ ९८ ॥ भ्रमेंना मरूपेंमात्रदिसती ॥ तेविवेकज्ञानेंनिरसती ॥ पुढेंउरेजेकानिश्चिती ॥ तेंकेवळब्रह्म ॥ ९९ ॥ श्लोक ॥ चिदेव पंचभूतानिचिदेवभुवनत्रयं ॥ ३३ ॥ विज्ञानमधुनासम्यगहमेवचिदेवहि ॥ टी० ॥ चिद्रूपचिपंचभूत ॥ चि द्रूपब्रह्मांडत्याचेंनेर्मित ॥ उत्तमज्यासमर्थीहोयविज्ञात ॥ तेव्हांचिद्रूपमीही ॥ ५०० ॥ अस्तिभातिप्रि यरूपब्रह्मीचें ॥ नामरूपजगादिमायेचें ॥ विवेचनहोतांउभयाचें ॥ सारासारकळे ॥ ५०१ ॥ तिहींकालींजें ननासे ॥ तेंसद्रूपजाणिजेऐसें ॥ अलंकारींसुवर्णजैसें ॥ असेव्यापून ॥ २ ॥ तेवींभूतादिजडसंपूर्ण ॥ याशीरूप कायसत्यावीन ॥ सत्याशींचठेविलेंनामाभिधान ॥ आकाशादिक ॥ ३ ॥ तिहींकालींजोदेखणा ॥ तोचिचिद्रूपओळखि जेमना ॥ हेंचंचळींयेतअनुमाना ॥ साक्षिरूपलें ॥ ४ ॥ सुखदुःखावीनआनंद ॥ जोसुषुप्तीमाजीअसेशुद्ध ॥ विकारी सुखदुःखेंउठेखेद ॥ तेव्हांलोपलावाटे ॥ ५ ॥ एवंजडींअसेसद्रूप ॥ चंचळींदोन्हीसच्चिद्रूप॥सुषुप्तीमाजजातांविक्षेप ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

 सच्चिदानंदतिन्ही ॥ ६ ॥ जडत्वींसद्रूपकैसें ॥ विवेचनेंबोलिजेकांहींसें ॥ तेणेंरीतीघेईजोविश्वासें ॥ नामरूपटाको
नी ॥ ७ ॥ प्रथमविकारआकाश ॥ रूपतेंचिजाणिजेअवकाश ॥ नामठेविलेंओळखीस ॥ अस्तित्वालागीं ॥ ८ ॥
आकाशआहेसेंवाटलें ॥ तेंचिसद्रूपदाटलें ॥ येरतेंनामरूपफोलें ॥ निस्तत्त्वरूपें ॥ ९ ॥ रज्जूवरीसर्पनसतां ॥ अज्ञानें
चिआणिलीसत्यता ॥ तेवींसत्यरूपनजाणतां ॥ आकाशनामठेविलें ॥ १० ॥ रज्जुवेगळासर्पननिघे ॥ तेवींनामरू
पात्मकअंगें ॥ आकाशकाढितांयेईलवेगें ॥ सत्यत्वाहूनकैसें ॥ ११ ॥ तस्मात्भ्रमेंचिभासलें ॥ भ्रमजातांनामरूप
फोलें ॥ पुढेंपूर्ववतजरीदेसलें ॥ तरितेंसद्रूप ॥ १२ ॥ तैसेंचिवायुतेजपाणी ॥ पांचवीतेहीधरणी ॥ आणि
भौतिकेंचारीखाणी ॥ पिंडब्रह्मांडासहित ॥ १३ ॥ स्वर्गमृत्युआणिपाताळ ॥ हेंइतुकेंजडरूपसकळ ॥ यांती
लविवेकेंकेवळ ॥ आहेपणानिवडावा ॥ १४ ॥ आतांचंचळतत्त्वजितुकें ॥ यांतीलसच्चिद्रूपानेकें ॥ विवेचूनकाढिजेसाधकें
॥ जिवींधराया ॥ १५ ॥ अहंस्फूर्तिहेंचंचलपण ॥ यांतसाक्षित्वेंवर्त्तेज्ञान ॥ जेंजेंहोईलतयाईक्षण ॥ करिताचिअसे ॥ १६
शब्दादिविषयहीउमटतां ॥ मिळालावाटेत्यात्याअतौता ॥ परीसाक्षीरूपेंजाणता ॥ तोवेगळाअसे ॥ १७ ॥ पाणियांतू
नगोडी ॥ रसरूपेंजेवींनिवडी ॥ तेवींचंचळांतूनपरवडी ॥ शुद्धजाणीवघेइजे ॥ १८ ॥ चंचळींजाणिवतेंचिद्रूप ॥ आणि
आहेपणातेंचिसद्रूप ॥ एवंब्रह्मींचेंहेंउभयरूप ॥ स्फूर्तीमाजीअसे ॥ १९ ॥ मनबुद्धिचित्तअहंकार ॥ आणिइंद्रिया
दिप्रकार ॥ जितुकेंचंचळसमग्र ॥ तेथेंव्याप्तिउभयांची ॥ २० ॥ सुषुप्तीमाजीतोस्पष्ट ॥ सच्चिदानंदघनदाट ॥ जेथें
व्यवहाराचाशेवट ॥ असेम्हणोनि ॥ २१ ॥ अंधारांतजरीनिजेला ॥ परीमीनाहींनवाटेकोणाला ॥ हाचिआहेपणा
संचला ॥ निस्तत्त्वेंवीन ॥ २२ ॥ मीअमुकवेळनिजलोंहोतों ॥ हाउत्थानकालींअनुभवघेतो ॥ एवंनेणिवेशीजोजाण

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri.

तो ॥ हाचिद्रूपआत्मा ॥ २३ ॥ वृत्तिजेथेंलीनहोय ॥ सहजसुखदुःखाशीअपाय ॥ तेव्हांआनंदहानिश्चय ॥ झोंपे माजी ॥ २४ ॥ एवंब्रह्मसच्चिदानंदरूप ॥ हेंचिआत्मयाचेंस्वरूप ॥ ऐसेंयथार्थजाणूननामरूप ॥ सर्वहींत्यागा वें ॥ २५ ॥ रज्जुयथार्थजरीकळतां ॥ सर्पनाहींनाहींतत्वतां ॥ तेवींवास्तविकब्रह्मजाणतां ॥ सर्वहेंनाहीं ॥ २६ ॥ आतांहींजडपंचभूतें ॥ आणिभौतिकादिसमस्तें ॥ त्रैलोक्यींनामरूपात्मकजेंतें ॥ सच्चिद्रूपब्रह्म ॥ २७ ॥ जडचंचळ हेंआटलें ॥ शून्यतेंहीलयागेलें ॥ उपरीओतप्रोतसंचलें ॥ सच्चिदानंदब्रह्म ॥ २८ एवंदेहबुद्धीजातां ॥ आपणब्रह्म चितत्वतां ॥ जगहीसर्वपाहोंजातां ॥ ब्रह्मरूपचि ॥ २९ ॥ आतांहेंसर्वदिसो ॥ कींएकदांचिसर्वनासो ॥ आप णाविनअतिसो ॥ दुजानाहीं ॥ ३० ॥ ऐसायाचिदेहींसाधक ॥ झालाशिवरूपनिश्चयात्मक ॥ नामरूपगेलेंअने क ॥ आत्मत्वज्ञानेंकडोनी ॥ ३१ ॥ ऐसेंहेंशिवाचेंध्यान ॥ भवबाधाजायनिपटून ॥ कारणकींमुळींचअसतीअभिन्न ॥ जीवशिवएकरूपें ॥ ३२ ॥ मुळींभिन्नजरीअसते ॥ तेएककदांहीनहोते ॥ हेंयथामतीबोलिजेतें ॥ पुढीलश्लोकीं ॥ ३३ ॥ ॥ श्लो० ॥ अतिस्वल्पतरायुःश्रीर्भूतेशांशाधिपोपियः ॥ ३४ ॥ सतुराजाहमस्मीतिवादिनंहंतिसान्वयं ॥ टी० ॥ आयु ष्यलक्ष्मीहीअतिअल्प ॥ शिवांशेंवर्ततेजिभूप ॥ अन्येंमीराजाम्हणतांविक्षेप ॥ त्याचावंशहीउरोंनदेती ॥ ३४ ॥ शि वांशावीनपृथिवीपति ॥ ॥ नव्हेचिऐशीलोकरीती ॥ तयाचीपाहतांसंपत्ति ॥ अल्पप्रायआहे ॥ ३५ ॥ तेवींचआयु ष्यहेंक्षणभंगुर ॥ उगेंचिमानितीमीमीथोर ॥ माझेंचिवैभवहेंअपार ॥ वंशपरंपराराज्यमाझें ॥ ३६ कोणीएकपुरुषव चनीं ॥ कींमीराजाबोलतांवाणी ॥ तेंमुख्यरायेंऐकतांश्रवणीं ॥ त्याचाघातचिकरी ॥ ३७ ॥ त्याचावंशस्थगर्भजरी ॥ क्रिमपिउरोंनेदीउरी ॥ एवंभिन्नभिन्नाचेंध्यानकरी ॥ तोनाशचिपावे ॥ ३८ ॥ तेवींभिन्ननव्हेशिवरूप ॥ तेंचिजीवाचें

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

निजरूप ॥ अज्ञानेंभिन्नझालेंअल्प॥तेंध्यानेंऐक्यपावे ॥३९॥ सार्धश्लोक ॥ कर्त्तापिसर्वलोकानामक्षय्यैश्वर्यवानपि॥३५॥
शिवःशिवोहमस्मीतिवादिनंयंचकंचन ॥ आत्मनासहतादात्म्यभागिनंकुरुतेभृशं ॥३६॥ टी० ॥ अकर्त्ताचिपरीमायावशें॥
सर्वलोककर्त्ताहोतसे ॥ आणिअक्षयीऐश्वर्यवसे॥ जयापाशीं ॥ ४० ॥ परोजीवेंमीशिवम्हणतां॥आत्मतादात्म्यदेतत्वतां॥
कींपुन्हाकदांहीमागुतां ॥ जीवत्वानये ॥ ४१ ॥ स्वरूपेंसच्चिद्घनतत्वतां ॥जेथेंद्वैताचीनसेवार्ता॥तोचिलोकदृष्टिहोयकर्त्ता ॥
सर्वजगाचा ॥४२॥ तैसेंचियशकीर्तिऔदार्य॥ज्ञानवैराग्यऐश्वर्य॥जोंकालमायातोंकालअक्षय॥मायेंअभावींनासती॥४३॥
तस्मात्महाकल्पापर्यंत ॥ ऐश्वर्यादिहेंशाश्वत ॥ ऐसेंअसतांध्यानजोकरीत ॥ शिवोहंम्हणोनी ॥ ४४ ॥ हेंमागील
श्लोकींनिरूपण ॥ जेंचिंतनरूपेंकरितांध्यान ॥ शिवसायुज्याहोयपावन ॥ जीवहाअविद्यात्यागें ॥ ४५ ॥ येथेंकोणीक
ल्पनाकरिती ॥ कींअविद्यात्यागेंविद्याप्राप्ति ॥ तरीऐश्वर्यादिधर्मउमटती ॥ आणिपंचवदनत्त्वादि ॥ ४६ ॥ तरीहेंऐसें
कदांनघडे ॥ कदाचित्घडतांपुन्हाविघडे ॥ विद्याअविद्यात्मकद्वैतमोडे ॥ तरीचजोडेऐक्यत्व ॥ ४७ ॥ अविद्याप्रति
बिंबजीवत्व ॥ विद्याप्रतिबिंबईश्वरत्व ॥ उपाधीअसतांअविनाशत्व ॥ होयकैसेंनि॥४८॥उभयउपाधीशींअज्ञानकारण॥
अज्ञानेंजाहलेंजीवाशिवदोन ॥ तेंअज्ञानजावयाज्ञान ॥ मुख्यबिंबाचेंव्हावें ॥ ४९ ॥ घटींअथवासरोवरीं ॥ प्रतिबिंबें
दिसतीसूर्यापरी ॥ परीतेंमिथ्याचिनिर्धारी ॥ वास्तविकतेंमुख्यबिंब ॥ ५० ॥ तैसेंअज्ञानेंदोन्हीझाले ॥ उपाधीनें
भिन्नभिन्नदिसूंलागले ॥ परीउभयांचेरूपमुख्यसंचलें ॥ सच्चिदानंदब्रह्म ॥ ५१॥ तस्मात्असज्जडदुःखात्मक ॥ विद्या
अविद्याह्यामायिक ॥ त्यांशीनिरसूननिश्चयात्मक ॥ उभयांचेंलक्ष्यघ्यावें ॥ ५२॥ मुळींचअसूनअभिन्नता ॥ जीवशिव
रूपेंपावलाद्वैतता ॥ तोमायिकतत्त्वज्ञाडाकारेतां ॥ जीवेशऐक्य ॥ ५३ ॥ देहद्वयाकारजेस्फूर्ति ॥ तेब्रह्माकारव्हावीनि

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्चिती ॥ द्वैतरूपमायिकभ्रांति ॥ जातांनिजरूपउरे ॥ ५४ ॥ हावृत्तीचास्वभाव ॥ निजध्यासेंजोहोयआठव ॥ तोंचिहोय स्वयमेव ॥ जीवहानिजांगीं ॥ ५५ ॥ मायिकहीनिजध्यासलागतां ॥ जीवहापावेतादात्म्यता ॥ मानिजांगेंब्रह्मअस तां ॥ ध्यानेंकांनव्हे ॥ ५६ ॥ तस्मात्सांडूनियांनामरूप ॥ ध्यानींधरावेंस्वस्वरूप ॥ हाचिसमाधिसविकल्प ॥ वृत्त्या त्मकत्वें ॥ ५७ ॥ याचिनांवेंकर्तृतंत्रध्यान ॥ येणेंचिहोयवस्तुतंत्रज्ञान ॥ मगसहजचिअभिन्न ॥ द्वैताद्वैतसांडूनि ॥५८॥ शौनकादिकांम्हणेसूत ॥ निरूपणींअसाकींदत्तचित्त ॥ उत्तमअधिकारीपावत ॥ श्रवणमात्रें ॥ ५९ ॥ आणिमध्यम हीअधिकारी ॥ निदिध्यासेंसायुज्यतावरी ॥ तिसराकनिष्ठअनधिकारी ॥ परंपरासाधनेंपावे ॥ ६० ॥ ऐसेंवेगळाले तुम्हांप्रति ॥ सांगितलेंहेंयथामती ॥ आतांसाधारणसाधननिश्चिती ॥ अतिसुगमबोलूं ॥ ६१ ॥ श्लोक ॥ धर्मार्थकाम मोक्षाणांपारंयास्यथयेनवे ॥ मुनयस्तत्प्रवक्ष्यामिव्रतंपाशुपताभिधं ॥३७ टीका ॥ पाशुपतनामेंहेंव्रत ॥ तेंचिऐकाबोलेन युक्त ॥ जेणेंमुनींहोपरपारपावात्वरित ॥ धर्मार्थकाममोक्षाच्या ॥ ६२ ॥ धर्मम्हणजेविहितकर्म ॥ जोजोज्यावर्णाचानियम॥ फलाशात्यागितांहोयपरम ॥ निकीहृदयशुद्धि ॥ ६३ ॥ नातरीफलाशेनें ॥ जन्माशीचलागेयेणें ॥ यास्तवकर्मातीतहोणें॥ साधकाविहित ॥ ६४ ॥ अर्थम्हणिजेतोधनाशी ॥ कामम्हणिजेतोइच्छेशी ॥ येणेंजीवनदेहबुद्धीशी ॥ तेचिवाढेअधि क ॥ ६५ ॥ तस्मात्त्रैविद्यहेंत्यागूनी ॥ साधकेंलागावेंगुरुभजनीं ॥ बंधमोक्षाचीमनींहूनी ॥ वार्ताहीसांडावी ॥ ६६॥ बंधास्तवमोक्षबोलिजे ॥ येन्हवींस्वरूपींकायअसेदुजें ॥ तेंचिअंगेंब्रह्मबलाहिजे ॥ अनायासेंसाधनीं ॥ ६७ ॥ पाशुप तव्रतजयाम्हणावें ॥ हेंकर्मधर्मात्मकनव्हे ॥ तरीहेंसत्गुरुभजनजाणावें ॥ जेंश्रेष्ठसर्वसाधना ॥ ६८ ॥ वेदांतसंमतींमुमु क्षूतें ॥ गुरुवीणदुजेंनसेदैवत ॥ कारणकींमायिकअशाश्वत ॥ इतरदेवअसती ॥ ६९ ॥ अन्यसाधनेंकांहींनकरितां ॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जयागुरुभक्तीआवडेचित्ता ॥ तरीतोपावेलअकृत्रिमता ॥ निजपरब्रह्मीं ॥ ७० ॥ मागेंचतुष्टयसंपन्न ॥ मुमुक्षुलाचेंबो
लिलेंचिन्ह ॥ हेंनसतांहीआवडेगुरुभजन ॥ तरीअधिकारयेतया ॥ ७१ ॥ कायिकवाचिकमानसिक ॥ गुरुवीणनेणें
चिअनेक ॥ तयापुढेंसाधनेंसकळिक ॥ हातजोडोनतिष्ठती ॥ ७२ ॥ बहुकासयाबोलणें ॥ ब्रह्मानंदेंघरपुसतयेणें ॥
माविवेकवैराग्यादिलक्षणें ॥ याशीकोणपुसे ॥ ७३ ॥ तरीऐकासावधान ॥ तयागुरुभक्तीचेंलक्षण ॥ ध्वनितार्थेंबोलिजे
गहन ॥ एकाश्लोकें ॥ ७४ ॥ श्लोक ॥ कृत्वातुविरजांदीक्षांभूतिरुद्राक्षधारिणः ॥ जपंतोवेदसाराख्यंशिवनामसहस्र
कं ॥ ३८ ॥ टी० ॥ विरजादीक्षाहेअंतरीं ॥ विभूतिरुद्राक्षधारणवरी ॥ शिवसहस्रनामजपवैखरी ॥ वेदसाराख्यना
में ॥ ७५ ॥ ऐकाविरजादीक्षातेकैशी ॥ रजोगुणकार्यनुद्भवेमानसीं ॥ कामक्रोधलोभादिकांशी ॥ तिळपात्रदिधलें॥७६॥
कामहाचिअतिखाणोरी ॥ महापापात्मादुराचारी ॥ हाकिंचितहीअसतांअंतरीं ॥ विघ्नकरीपरमार्था ॥ ७७ ॥ एकका
मत्यागेंवनाजाती ॥ एकक्रोधामुखींसांपडती ॥ थित्यापरमार्थाआंचवती ॥ आणिइहपरसुखा ॥ ७८ ॥ आणिलोभतोन
ष्टमोठा ॥ देहबुद्धीचाशेलकावांटा ॥ येणेंपरमार्थाच्यावाटा ॥ बुजोनटाकिल्या ॥ ७९ ॥ तस्मात्कामक्रोधलोभ ॥ हेचि
रजोगुणाचेगर्भ ॥ याशीत्यागितांसुलभ ॥ मोक्षमार्गहोय ॥ ८० ॥ कामक्रोधादिकमळझडतां ॥ सहजहोयविरजता ॥
हेचिदीक्षाबोलिजेतत्त्वतां ॥ अंतर्बाह्यशुद्ध ॥ ८१ ॥ विभूतिलावणेंधर्मशरिराचा ॥ हाप्रकारकायिकसेवेचा ॥ संतसाधुस
द्गुरूचा ॥ देहहादासकीजे ॥ ८२ ॥ संतसाधुआणिसज्जन ॥ ह्याचिशिवाच्याविभूतिपूर्ण ॥ यांचेंशरीरेंकीजेसेवन ॥ हेंचि
लेपनभस्माचें ॥ ८३ ॥ अक्षह्मणिजेइंद्रियगण ॥ अथवाचतुष्टयअंतःकरण ॥ हेंकरितीरुद्राचेंईक्षण ॥ पदार्थ
मात्रीं ॥ ८४ ॥ रुद्रह्मणजेदृश्यामाजी ॥ अस्तिभातिप्रियत्वसहजीं ॥ नामरूपेंचिनदेखेदुर्जी ॥ हेंचिरुद्राक्षधारण ॥८५॥ ॥१९॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शिवगुरूचेंसहस्रनाम ॥ वेदसाराख्यजेंपरम ॥ वचनींकारुण्याचानेम ॥ गुरुस्तवनरूपें ॥ ८६ ॥ एवंविभूतिहेसेवा
कायिक ॥ रुद्राक्षप्रीतीमानसीक ॥ शिवसहस्रनामवाचिक ॥ त्रिधापरीगुरुभक्ति ॥ ८७ ॥ ऐशीगुरुभक्तिउठतांअं
तरीं ॥ विरजादीक्षाअपेक्षीवरी ॥ तेविरजादीक्षाहोतांझडकरी ॥ गुरुभक्तिघडे ॥ ८८ ॥ एवंअंतरींहेंनघडतां ॥ वि
भूतिरुद्राक्षधारणकरितां ॥ अथवासहस्रनामजपतां ॥ गीतार्थाअधिकारीनव्हे ॥ ८९ ॥ विरजादीक्षागुरुभक्तीअंतरीं॥
तरीमगदाखवोबाहेरी ॥ विभूतिरुद्राक्षसहस्रनामवैखरी ॥ लौकिकींशोभापावे ॥ ९० ॥ परीअंतरींनसतांजेंकरणें ॥
कांहींस्वहितनघडेयेणें ॥ स्वहितकरावेंवाटेतेणें ॥ गुरुभक्तिकरावी ॥ ९१ ॥ कायेनेंगुरुसेवाचकरावी ॥ अखंडदा
स्यलालावावी ॥ नित्यचौगुणीआवडीअसावी ॥ अंतरापासूनी ॥ ९२ ॥ प्रपंचअवघाचित्यागावा ॥ गुरुसेवेंदेहविका
वा ॥ मीमाझेंपणाचागोंवा ॥ नद्यावापडूं ॥ ९३ ॥ जितुकेंगुरुसेवेचेंलक्षण ॥ तेंतेंकीजेअभिमानत्यागून ॥ जेणेंसद्गुरु
होयप्रसन्न॥कळवळूनबोधकरी ॥९४॥ सद्गुरुजोंवरीनहोतांप्राप्त ॥ तोंकालअंतरींअसावाहेत ॥ मानसींभजनअखंडित॥
स्मरणध्यानरूपें॥९५॥सद्गुरुमजकैंभेटती ॥ केधवांभवापासूनसोडविती॥दारापुत्रादिप्रपंचप्रहस्तीं ॥ मजकिमपिसुखना
हीं॥९६॥ऐसेंअंतर्ध्यानजेव्हांलागलें ॥ तेव्हांविष्णवादिदेवजरीआले॥सालोक्यादिमुक्तिदेऊंलागले ॥ तरीसाधकेंअपेक्षूं
नये॥९७॥त्यांशींइतुकेंचिमागावें ॥ कींमजसद्गुरूशींभेटवावें॥मगतेहीकृपाळुस्वभावें ॥ इच्छिलेंपुरविती॥९८॥एवंगुरुभ
क्तिहेमानसिक ॥ आतांऐकाकैशीवाचिक ॥ सर्वहीव्यवहारलौकिक ॥ त्यागूनवाणीगुरुनामीं ॥ ९९ ॥ अहोशिवशि
वासद्गुरु ॥ सदाशिवशंकरकरुणाकरु ॥ मजदीनाशीपरपारु ॥ प्रबोधमात्रेंपाववावें ॥ ६०० ॥ मजवत्साचीतूं
गाय ॥ मजलेंकुराचीतूंमाय ॥ कृपाघनतूंओळूनये ॥ मजचातकाशी ॥ १ ॥ कृपामृतरूपेंतूंचंद्र ॥ मीमुमुक्षुजेवींचकोर॥

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तूंपयोनिधिक्षीरसागर ॥ मीमत्स्यक्रीडेंतुजमाजी ॥ २ ॥ एवंवाणीप्रवर्तेंभजनीं ॥ अतिउत्कंठालागलीमनीं ॥ तेणें
पूर्वचिन्हेंपालटोनी ॥ दैवीसंपत्तिप्राप्त ॥ ३ ॥ शौनकहोनिश्चयअवधारा ॥ ऐशीगुरुभक्तिउपजेअंतरा ॥ तरीगीतार्था
चेअधिकारा ॥ प्राप्तव्हालसहज ॥ ४ ॥ श्लोकार्ध ॥ संत्यज्यतेनमर्त्यत्वंशैवींतनुमवाप्स्यथ ॥ टी० ॥ ऐशियाविरजा
दीक्षेंकडून ॥ मर्त्यत्वबुद्धिहेत्यागून ॥ शैवीतनुअधिकारचिन्ह ॥ पावालयेक्षणीं ॥ ५ ॥ दीक्षागुरुभक्तिझालिया ॥
पूर्वचिन्हेंपालटतीअपसया ॥ असुरींसंपत्तीम्हणनेंजया ॥ दंभदर्पादि ॥ ६ ॥ विवेकवैराग्यआदिकरून ॥ शमदमा
दिमुमुक्षुत्वचिन्ह ॥ हेंदैवींसंपत्तीचेंलक्षण ॥ शैवीतनुहेऐशी ॥ ७ ॥ त्रिविधागुरुभक्तीच्यायोगें ॥ अधिकारसंप
त्तिपावालअंगें ॥ शिवगुरुप्रसन्नहोऊनवेगें ॥ समर्पीलइच्छिलें ॥ ८ ॥ श्लोक ॥ ततःप्रसन्नोभगवान्शंकरोलोकशं
करः ॥ ३९ ॥ भवतांदृश्यतामेत्यकैवल्यंवःप्रदास्यति ॥ टी० ॥ नंतरभगवानूश्रीशंकर ॥ प्रसन्नहोऊनलोकसुख
कर ॥ तुम्हाशीतोदृश्यप्राप्ताधिकार ॥ कैवल्यमुक्तिदेईल ॥ ९ ॥ नंतरम्हणजेगुरुभक्तिझालिया ॥ शिवहागुरुरूपें
प्रगटेतया ॥ प्रसन्नहोऊनश्रवणादिउपाया ॥ लावीनिजांगें ॥ १० ॥ भगवानूशब्देंषड्गुण ॥ ज्ञानादिहेंप्रखरचिन्ह ॥
सद्गुरूपाशींअनुदिन ॥ वर्ततअसे ॥ ११ ॥ सर्वलोकांशींसुखकर ॥ दर्शनज्याचेंमनोहर ॥ याहेतुनामेंशंकर ॥ सद्गुरु
नाथु ॥ १२ ॥ अथवानिजसुखआपुलें ॥ द्यावयासत्रचिघातलें ॥ मुमुक्षुसाधकजेभुकेले ॥ निजतृप्तिपावती ॥ १३ ॥
ऐसाश्रीशिवसद्गुरु ॥ प्रसन्नहोऊनकरुणाकरु ॥ आणितुम्हींहीप्राप्ताधिकारु ॥ तरीकैवल्यतुम्हादेईल ॥ १४ ॥
मीदेहऐसाअज्ञानभ्रम ॥ वाउगाचिवाढलाअसेसंभ्रम ॥ याचेनिरसनार्थत्वंब्रह्म ॥ असशीम्हणोनिउपदेशिती ॥१५॥ ॥२०॥
स्वानुभवेंउठतांब्रह्मस्फूर्ती ॥ निःशेषअज्ञानजायभ्रांती ॥ सहजींकैवल्याचीप्राप्ति ॥ जीवेशऐक्यरूपें ॥ १६ ॥ ऐसा

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

शिवगुरुह्मासमर्थ ॥ कैवल्यरूपदेतसेपरमार्थ ॥ हाचियाशिवगीतेचाअर्थ ॥ विषयरूपेंऐक्यभाक्ति ॥ १७ ॥ कैवल्यप्राप्तिहेंप्रयोजन ॥ संबंधसाध्यसाधकदोन ॥ आणिअधिकाराचेंहींचिन्ह ॥ याअध्यायींबोलिलें ॥ १८ ॥ अनधिकारियाकेसाअधिकार ॥ यास्तवबोलिलागुरुभक्तिप्रकार ॥ शिवदीक्षारूपसाविस्तर ॥ यथामतीतुह्माशीं ॥ १९ ॥ हेंचिविरक्तादीक्षेचेंरूपपुढें ॥ बोलिजेलतुह्माशउिघडें ॥ तेंमुमुक्षुजनअतिचाडें ॥ ऐकोतनिरूपण ॥ २० ॥ श्लोक ॥ रामाय दंडकारण्येयत्प्रादात्कुंभसंभवः ॥ ४० ॥ तत्सर्वंवःप्रवक्ष्यामिशृणुध्वंभक्तियोगतः ॥ इतिश्रीशिवगीतायांसूतऋषिसंवादेप्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ टी० कुंभसंभवजोअगस्ति ॥ दंडकारण्यींरामाप्रति ॥ जेंदेताझालाऐकाभक्ती ॥ तेंसर्वबोलेनतुम्हाशी ॥ २१ ॥ केशीरामेंदीक्षाघेतली ॥ जेअगस्तीनेंप्रबोधिली ॥ तेथेंफलप्राप्तिकायझाली ॥ तेंतेंबोलेनसर्व ॥ २२ ॥ आणिशिवकैसाप्रकटला ॥ रामाशीकायबोधिताझाला ॥ तेंतेंसांगेनतुह्माला ॥ जरीअसेअत्यंतचाड ॥ २३ ॥ श्रद्धारूपआवडीवीन ॥ व्यर्थचिजायनिरूपण ॥ तस्मातूएकाग्रकरोनिमन ॥ श्रवणकरावें ॥ २४ ॥ येथेंशौनकादिकाचेपंक्ति ॥ तत्परअसावेंसाधकश्रोतीं ॥ शिवराघवसंवादउक्ति ॥ प्रगटेलपुढें ॥ २५ ॥ वेदउक्तहेशिवगीता ॥ व्यासेंनिरूपिलीतत्वतां ॥ तोचिगीर्वाणअर्थप्राकृता ॥ माजीकाढिलाअसे ॥ २६ ॥ वेदह्मणजेजेंजाणणें ॥ पराव्काचाजयेतेंम्हणणें ॥ जेथूनॐकारासहितयेणें ॥ मात्रावैखरीशी ॥ २७ ॥ परापश्यंतिमध्यमावैखरी ॥ ह्याअनादीचवाणीचारी ॥ त्यांचेप्रकारहोतीअनेकापरी ॥ संस्कृतप्राकृतरूपें ॥ २८ ॥ तस्मात्शब्दजेजेउठती ॥ मातृकाक्षरेंउमटती ॥ तेंतेंवेदत्रिमात्रात्मकनिश्चिती ॥ अन्यथानव्हे ॥ २९ ॥ यास्तवहेंवेदोक्तसारें ॥ निरूपणअसेसाचोकारें ॥ भाविकघरितील

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जेआदरें ॥ तेअर्थरूपफळलाहती ॥ ३० ॥ इतिश्रीमद्वेदेश्वरी ॥ शिवगीतापद्मपुराणांतरीं ॥ शिवराघवसंवादानुका
रींप्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ओंव्यासंख्या ॥ ६३० ॥ श्लोक ॥ ॥ ४० ॥ श्रीशिवरामगुरवर्पणमस्तु० ॥ छ छ छ

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

।ॐ॥

अथश्रीमद्वेदेश्वरीअ गस्त्यराघवसंवादद्वितीयोऽध्यायःप्रारंभः

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीशिवरामगुरवेनमः ॥ सावधानअसावेंश्रोतां ॥ परमार्थप्रकटेलआतां ॥ परमगुह्यहेशिवगीता ॥ शिवाअंतरींची॥१॥
जीवाच्याभाग्योदयासाठीं ॥ रामेंइच्छाधरिलीपोटीं ॥ जेवींपुत्रास्तवखटपटी ॥ पितयाशीहोय ॥ २ ॥ सहस्त्रकिर
णाचेंभ्रमण ॥ स्वात्मार्थनसेजाण ॥ जेणेंप्रकाशेक्रियाचरण ॥ त्रैलोक्याशी ॥ ३ ॥ तेंवीश्रीरामेंशिवगीता ॥ तयाप्र
योजननसतांस्वतां ॥ केवळजीवाचियाहिता ॥ अतिसायासेंप्रगटविली ॥ ४ ॥ तस्माज्जीवाचाभाग्योदय ॥ झालावाट
तसेनिश्चय ॥ तरीअवधारावीसोय ॥ गीतार्थाची ॥ ५ ॥ पूर्वाध्यायींशौनकांसूत ॥ बोलिलाविरजादीक्षेचासंकेत ॥ कीं
हेदीक्षाशिवरामपावत ॥ अगस्तीमुखें ॥ ६ ॥ हेंऐकोनियांशौनकीं ॥ प्रश्नकेलासकौतुकीं ॥ तोचिआरंभींदिढाश्लो
का ॥ बोलिजेल ॥ ७ ॥ सार्द्धश्लोक ॥ ऋषयऊचुः ॥ किमर्थमागतोऽगस्त्योरामचंद्रस्यसन्निधिं ॥ कथंवाविरजांदी
क्षांकारयामासराघवं ॥ १ ॥ ततःकिमाप्तवान्रामःफलंतद्वक्तुमर्हसि ॥ टीका ॥ रामचंद्राच्यासन्निधान ॥ किमर्थअ
गस्तीचेंझालेंआगमन ॥ केंशीविरजादीक्षापूर्ण ॥ करविताझाला ॥ ८ ॥ नंतरफळजेंपावलाराम ॥ तेंऐकावेंइच्छूंआ
म्हीपरम ॥ तरीबोलावयाअतिसुगम ॥ योग्यअससीसूता ॥ ९ ॥ रामनिजांगेंआत्माराम ॥ सकलसिद्धपूर्णकाम ॥ भू
भारहरावयापरम ॥ विष्णूचअवतरला ॥ १० ॥ अविद्यामुळींनसेसहज ॥ तेथेंकैसेंकार्यरज ॥ तरीदीक्षाहेविरज ॥
श्रीरामाअसंभव ॥ ११ ॥ कामादिकांहींअसावे ॥ तरीचवैराग्येंनिरसावे ॥ अगस्तीनेंदीक्षाकर्मकरवावें ॥ रामाप्र
तिकैसें ॥ १२ ॥ मुळींनाहींअज्ञानभ्रांति ॥ तेथेंकैचीज्ञानसंपत्ति ॥ निष्कामाशीकर्मफलप्राप्ति ॥ हेंहीअघटीत ॥ १३ ॥
जरीह्मणशदिहधरिला ॥ मानवरूपीभुवींअवतरला ॥ तरीपूर्वींवसिष्ठेंबोधिला ॥ निःसंशयपणें ॥ १४ ॥ तरीतयाफले
च्छाकोणती ॥ कींअमुकव्हावीफलप्राप्ति ॥ हेंसांगावयाआम्हांप्रति ॥ सूतातूंयोग्यहोशी ॥ १५ ॥ ऐकूनशौन

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कांचेंवचन ॥ सूतबोलताझालाआपण ॥ तेंचिऐकावेंसावधान ॥ श्रोतेजनीं ॥ १६ ॥ श्लोक ॥ सूतउवाच ॥
रावणेनयदासीताऽपहृताजनकात्मजा ॥ २ ॥ तदावियोगदुःखेनविलपन्नासराघवः ॥ टी० ॥ रावणेंजेव्हांहरिली
सीता ॥ रामपत्नीजनकदुहिता ॥ तेव्हांवियोगदुःखेंरामवरुता ॥ शोककरीतबैसला ॥ १७ ॥ सूतह्मणेशौन
कांप्रति ॥ तुह्मीजेंजेंपुशिलेंनिश्चिती ॥ तेंतेंअनुक्रमेंयथारीति ॥ बोलिजेलऐका ॥ १८ ॥ रामलक्ष्मणसीता ॥
पंचवटिकेशीअसतां ॥ संधिपाहूनजनकदुहिता ॥ रावणेंहरिली ॥ १९ ॥ मृगापाठीहोतेगेले ॥ मागुतींआश्रमा
शजिंआले ॥ तोंसीतेलागींहरूननेलें ॥ हेंकळलेंरामचंद्रा ॥ २० ॥ तेव्हांमानवीक्रियावरीवरी ॥ दाविलीपाहिजे
जैशीखरी ॥ याहेतूस्तवशोककरी ॥ अतिअटाहास्यें ॥ २१ ॥ मनामाजीतोनिजकांता॥ठेविलीअसेअग्निअतौता ॥ रा
वणेंनेलीछायासीता ॥ हेंठाउकेंचिअसे ॥ २२ ॥ आणिपूर्वींचहोतीप्रतिज्ञाकेली ॥ कींराक्षसपंक्तिपाहिजेवधिली ॥ ते
व्हांरावणाकैसामारीनखंतीवाटली ॥ नाहींचश्रीरामा ॥२३॥ रावणवधार्थअवतार ॥ हेतरीचिंतानसेअणुमात्र ॥ आ
णिसीतातरीनिरंतर ॥ स्वसान्निधअसे ॥ २४ ॥ तरीरामाशोककरावयाचें ॥ कारणकायअसेसाचें ॥ तेंचिगुह्यप्रगट
वाचे ॥ बोलेनऐका ॥ २५ ॥ सीतावियोगाचेंकरूननिमित्त ॥ पूर्वीलआठवताझालासमस्त ॥ तोरामाचेअंतरींचाहेत
बोलूनदाखवूं ॥ २६ ॥ मनींविचारीश्रीराम ॥ कींमीपूर्णब्रह्मआत्माराम ॥ जेथेंमायेसहितद्वैतभ्रम ॥ उद्भवलाचना
हीं ॥ २७ ॥ ऐसापूर्णमीनिर्विकार ॥ तोचिमायावशेंझालोंईश्वर ॥ कर्तृत्वनियंतृत्वप्रकार ॥ म्यांमाथांघेतले ॥ २८ ॥
भूतभौतिकेंकरूननिर्माण ॥ जीवरूपेंमीप्रवेशलोंआपण ॥ तस्मात्जीवहीमजहूनिभिन्न ॥ नसतिकिमपि ॥ २९ ॥ म ॥ १ ॥
जईश्वरत्वजरीआलें ॥ तरीस्वानुभवज्ञानअसेवहिलें ॥ जीवत्वजेव्हांप्रगटलें ॥ तेव्हादेहबुद्धिआली ॥ ३० ॥ आत्म

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रूपींहाविकारनसतां ॥ आणिदेहासर्हीदेहमीनवाटेतत्वतां ॥ परीयादेहबुद्धीशीजोधर्ता ॥ तोहाअहंकारु ॥ ३१ ॥
सत्यत्वब्रह्मींचेंघेतलें ॥ असत्यदेहादिकांअवलंबिलें ॥ उगोंचिमीमीहेंस्फुरूंलागलें ॥ उभयात्मकअहंकारा ॥ ३२ ॥
तस्मात्अज्ञानहाभवसागर ॥ मार्जीरावणहाचिअहंकार ॥ कामक्रोधादित्याचापरिवार ॥ देहलंकापुरींराहिला ॥३३॥
स्वस्वरूपनिजानुभूती ॥ हेईश्वरनिष्ठअसेप्रतीति ॥ परीजीवाचीस्वकीयअनुभूति ॥ अहंकारनिष्ठझाली ॥ ३४ ॥ एवं
मन्निष्ठस्वानुभूतीसीता ॥ रावणअहंकारुझालाहर्त्ता ॥ हेचिखंतीवाटतसेचित्ता ॥ मजईश्वराची ॥ ३५ ॥ मजयाजीवा
चियाकणवें ॥ ईश्वरत्वलागलेंधरावें ॥ कींजीवाचेंस्वहितकरावें ॥ अवतारघेऊनि ॥ ३६ ॥ विधिरूपेंवेददैत्येंनेले ॥ ते
व्हांम्यामत्स्यरूपधरिलें ॥ शंखासुरावधूनआणिलें ॥ वेदविधीतें ॥ ३७ ॥ दैवीसंपत्तिसागरींपडली ॥ तेव्हांम्यांकूर्मा
चीतनुधारिली ॥ देवदैत्यमिळूनकाढिली ॥ मथूनसागरा ॥ ३८ ॥ हिरण्याक्षदुष्टहामातला ॥ तोवाराहरूपेंम्यांनिवटि
ला ॥ आणिहिरण्यकशिपुवधिला ॥ नृसिंहहोऊन ॥ ३९ ॥ इंद्राशींस्पर्धाकारितांबळी ॥ तोम्यांवामनेंघातलापाता
ळीं ॥ दैत्यांशेंमाजलीक्षत्रियमंडळीं ॥ तेम्यांनिवटिलीपरशुरामें ॥ ४० ॥ तोचिमीहारघुनंदन ॥ रावणवधार्थपावलों
जनन ॥ तरीलंकापुराशींजाऊन ॥ वधीनत्यासहपरिवार ॥ ४१ ॥ परीमींइतुकेंहीकरितां ॥ नाहींकेलेंजीवाचेंस्वहि
ता ॥ अनादिअहंकाररावणतत्त्वतां ॥ नाहींजरीवधिला ॥ ४२ ॥ जीवाशीअहंकारेंकष्टविलें ॥ तयाचेंहनननाहींघड
लें ॥ वरीवरीस्थूळदैत्यनिर्दाळिले ॥ यांताहितकायजीवाचें ॥ ४३ ॥ तयाअहंकारानवधितां ॥ अनुभूतीसीतानआणितां ॥
येणेंशोकेंअतिव्याकुळता ॥ श्रीरामेंमांडिली ॥ ४४ ॥ श्लोक ॥ निर्निद्रोनिरहंकारोनिराहारोदिवानिशं ॥ ३ ॥ मो
कुमैच्छततःप्राणान्सानुजोरघुनंदनः ॥ टीका ॥ अनुजासहितरघुवीर ॥ मीअमुकहानाहींअहंकार ॥ दिवानिशिन

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हींनिद्राआहार ॥ शेवटींप्राणहीत्यागूंइच्छि ॥ ४५ ॥ मजकडूनयाजीवाचें ॥ हितचिनव्हेजरीसाचें ॥ तरींदेहधरून
प्राणाचें ॥ संरक्षणव्यर्थ ॥ ४६ ॥ अंतर्बाह्यरिपुनिवटावे ॥ तरींचक्षात्रकुळींजन्मावें ॥ ऐसेंनहोतांव्यर्थजाणावे ॥ नां
वाचेक्षत्रिय ॥ ४७ ॥ तस्मात्क्षात्रियमीम्हणवितां ॥ लाजवाटेमाझियाचित्ता ॥ ऐशियाखेदेंअहंकारत्याजिता ॥ होय
श्रीराम ॥ ४८ ॥ मगादिवसअथवारात्र ॥ कैंचीनिद्राकैंचाआहार ॥ अनुजासहितरघुवीर ॥ रडेपडेआक्रंदे ॥४९॥
सौमित्रयेऊनिचरणधरी ॥ जीजीआपणतरीअसोक्षत्री ॥ रावणमारूंक्षणार्द्धामाझारी ॥ लंकापुराजाउनी ॥ ५० ॥
व्यर्थशोकीकासयाव्हावें ॥ आतांचियेक्षणींचलावें ॥ जितुकेराक्षसअसतीआघवे ॥ मारूनजानकीआणूं ॥ ५१ ॥ प
रीरामनेदीचप्रत्युत्तर ॥ म्हणेमाझाहेतुनकळेयानिर्द्धार ॥ तथापिमीसांगूंसविस्तर ॥ तरीयाचाउपायनकळेया ॥५२॥
याजीवाचीकरावयासोडवण ॥ पाहिजेश्रीसद्गुरुआपण ॥ तरीचहोयअज्ञानखंडन ॥ अहंकारासाहित ॥ ५३ ॥ हा
अर्थमनींचामनींठेवून ॥ सौमित्राशींनेदीवचन ॥ हासीतेहासीतेम्हणवून ॥ वनींहांकामारी ॥ ५४ ॥ तंवऋषि
सुतगंगातीरीं ॥ स्नानेंकरूनजातांमाघारी ॥ वार्त्तासीताहरणाचीखरी ॥ ऐकिलीतेहीं ॥ ५५ ॥ तैसेचिआश्रमाप्र
तिआले ॥ अगस्तीशींवर्त्तलेंसांगितलें ॥ येरुम्हणेआपणापाहिजेगेलें ॥ संबोखावयाभेटी ॥ ५६ ॥ कोणाशिदुःख
अथवाहोतांहानि ॥ तयाशांतवनकरावेंजाऊनी ॥ ऐसाश्रेष्ठाचारपूर्वींपासूनी ॥ चालतआला ॥ ५७ ॥ श्लोकार्द्ध ॥
॥ लोपामुद्रापतिर्ज्ञात्वातस्यसान्निधिमागमत् ॥ ४ ॥ टीका ॥ यास्तवउठोनियांअगस्ती ॥ आलागोदावरीतटाप्रति ॥
तंवदोघेदेखिलेदाशरथि ॥ म्लानवदनींदीनरूप ॥ ५८ ॥ जानूमध्येंमस्तकघालूनी ॥ रामबैसलाअधोवदनीं ॥ हेंअ
गस्तीनेंदेखुनी ॥ थापटुनीसावधम्हणती ॥ ५९ ॥ परीरामनेदीचउत्तर ॥ नाहींसत्कारनानमस्कार ॥ हासीतेम्हणून

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आक्रंदेंथोर ॥ भ्रमिष्टाचियेपरी ॥ ६० ॥ राममनींम्हणेहाब्रह्मवेत्ता ॥ प्रवर्तेलचिजीवाचियाहिता ॥ यास्तव
कांहींप्रश्नकरितां ॥ मौनेंचिऐके ॥ ६१ ॥ लोपामुद्रापतिअगस्ती ॥ रामाचाहेतुनजाणूनाचित्तीं ॥ कींयाशीसीता
वियोगाचीखंती ॥ तेंचिजाणोनबोलताझाला ॥ ६२ ॥ तेंचिश्रोतींसावधऐकावें ॥ येणेंचिविवेकवैराग्यप्राप्तव्हावें ॥
मुमुक्षाउपजोनिजीवसुटावे ॥ भवसागराहूनि ॥ ६३ ॥ श्लोक ॥ अथतंबोधयामाससंसारासारतांमुनिः ॥
अगस्त्यउवाच ॥ किंविषीदसिराजेंद्रकांताकस्यविचार्यताम् ॥ ५ ॥ टीका ॥ श्रोतेहोऐकारामाप्रती ॥
कायबोलताझालाअगस्ति ॥ सर्वसंसारहानिश्चिती ॥ मिथ्याभूतअसे ॥ ६४ ॥ सकलराजांचातूंइंद्र ॥
यास्तवनामेंराजेंद्र ॥ शोककांकरिशीहेरामचंद्र ॥ कांताकोणाचीविचारीं ॥ ६५ ॥ स्त्रीजिहेमाझीम्हणशी ॥
तेजडदेहाचीतेआत्मयाशी ॥ आणिस्त्रीम्हणिजेजयेशी ॥ तेंदेहकींआत्मा ॥ ६६ ॥ श्लोक ॥ जडःकिन्नुविजाना
सिदेहोऽयंपांचभौतिकः ॥ निर्लेपःपरिपूर्णश्चसच्चिदानंदविग्रहः ॥ ६ ॥ टी० ॥ देहतरीजडअत्यंत ॥ पंचभूतां
चेहेनिर्मित ॥ हेंकांनजाणशीसमस्त ॥ तेथेंमीमाझेंहाअसंभव ॥ ६७ ॥ आत्मातरीनिर्लेपपरिपूर्ण ॥ तनूज्याचीसच्चिद्घ
न ॥ तेथेंहोमीमाझेंम्हणेकोण ॥ तिहींकाळीं ॥ ६८ ॥ येथेंदुःखजेंउद्भवलें ॥ आत्मयाशिनाहींस्पर्शलें ॥ तेंचिदृष्टांतयुक्तऐकि
लें ॥ पाहिजेतुवां ॥ ६९ ॥ श्लोक ॥ आत्मानजायतेनैवम्रियतेनचदुःखभाक् ॥ सूर्योसौसर्वलोकस्यचक्षुस्त्वेनव्यवस्थितः ॥ ७ ॥
॥ टी० ॥ आत्माजन्मलाचिनाहींठायींचा ॥ तेथेंमृत्युयेईलकैंचा ॥ जन्ममरणाभावींसुखदुःखाचा ॥ विभागीनव्हे ॥ ७० ॥
हाचिसर्वलोकांचासूर्य ॥ चक्षुरूपेंराहिलानिश्चय ॥ नानात्वेंझालावाटेपरीअद्वय ॥ एकरूपअसे ॥ ७१ ॥ श्लोक ॥
तथापिचाक्षुषैर्दोषैर्नकदाचिद्विलिप्यते ॥ सर्वभूतांतरात्मापितद्वद्दृश्यैर्नलिप्यते ॥ ८ ॥ टी० ॥ सूर्यचक्षुरूपेंजगींराहि

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ला ॥ चक्षूशीरोगजरीउद्भवला ॥ तेणेंपिंवळाद्विधावाटेदिसला ॥ परीत्यादोषेंनिर्लेपसूर्य ॥ ७२ ॥ तैसाआत्माअसो
नसर्वांभूतीं ॥ जगाचीजेसुखदुःखप्रतीति ॥ अज्ञानबुद्धीनेंआरोपिती ॥ परीआत्मानिर्लेप ॥ ७३ ॥ आतांदेहजरीपांच
भौतिक ॥ म्हणोंसुखदुःखभोगीअवश्यक ॥ तरीऐकयाचाविवेक ॥ दिढाश्लोकीं ॥ ७४ ॥ सार्द्धश्लोक ॥ देहोपिमल
पिंडोयंमुक्तजीवोजडात्मकः ॥ दह्यतेवन्हिनाकाष्ठैःशिवाद्यैर्भक्ष्यतेऽपिवा ॥ ९ ॥ तथापिनैवजानातिविरहेतस्यकाव्यथा ॥
॥टी० ॥ रक्तरेतमातापित्याचें ॥ हेदेहमलपिंडाचे ॥ जीवेंसोडिलेंअसतांसाचें ॥ मडेंहेंजडात्मक ॥ ७५ ॥ काष्टेंमेळवून
अग्निपेटविला ॥ तेणेंनिःशेषजरीजाळिला ॥ अथवाकोल्हेकुतरेयांनींखादला ॥ तरींदेहनकोनम्हणें ॥७६॥ माझादेहअ
ग्नीनेंजळे ॥ कींखातींकुतरींकोल्हे ॥ हेंदेहासीकांहींचनकळे ॥ माविरहतरीत्याकैंचा ॥ ७७ ॥ एवंरामाशोकजोवाटला ॥
तोदेहाशीनाआत्मयाशीझाला ॥ आतांपाहिजेविचारऐकिला ॥ स्त्रियेचाकैसा ॥ ७८ ॥ श्लोक ॥ सुवर्णगौरीयादुर्वाद
लवच्छामलाऽपिवा ॥ १० ॥ पीनोत्तुंगस्तनांभोगभुग्नसूक्ष्मविलग्निका ॥ टी० ॥ कायागौरसुवर्णाऐशी ॥ अथवाश्या
मादूर्वादलजैशी ॥ परीमांसमयीआनखकेशीं ॥ दुजाभावनाहीं ॥ ७९ ॥ मोठेउंचस्तनजीचे ॥ करस्पर्शेंशिथिलल
ज्याचें ॥ कटींसूक्ष्मत्वासिंहाचे ॥ परीमाजहाबारीक ॥ ८० ॥ श्लोक ॥ बृहन्नितंबजघनारक्तपादसरोरुहा ॥ ११ ॥
राकाचंद्रमुखीबिंबप्रतिबिंबरदच्छदा ॥ टी० ॥ मोठेनितंबआणिजघन ॥ रक्तकमलाऐसेचरण ॥ पौर्णिमेचाचंद्रपूर्ण ॥
त्यापरीमुखविकाश ॥ ८१ ॥ रक्तवर्णतोंडोळें ॥ तैसेदिसतीओंठकोंवळे ॥ तयावरूनीलाळगळे ॥ त्याम्हणतीमुखा
मृत ॥ ८२ ॥ सार्द्धश्लोक ॥ नीलेंदीवरनीकाशनयनद्वयशोभिता ॥ १२ ॥ मत्तकोकिलसँल्लापामत्तद्विरदगामिनी॥ ॥ ३ ॥
कटाक्षैरनुगृण्हातिमांपंचेषुशरोत्तमैः ॥ १३ ॥ टी० ॥ नीलकमलासारिखेनयन ॥ मत्तकोकिलासारखेंवचन ॥ मत्त

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गजाऐसेंगमन ॥ जयेचेंअसे ॥ ८३ ॥ नेत्रकटाक्षेंकडून ॥ उत्तमप्रकारेंमारीकामबाण ॥ तेणेंमनोरूपमृगाचेंहनन ॥ हो
यपुरुषाचें ॥ ८४ ॥ श्लोक ॥ इतियांमन्यतेमूढःसतुपंचेषुशासितः ॥ तस्याविवेकंवक्ष्यामिशृणुष्वावहितोनृप ॥ १४ ॥
॥ टी० ॥ तेकटाक्षबाणमजपीडिती ॥ ऐसेंजेकामूर्खमानिती ॥ तेनरपुनरावृत्तिपावती ॥ यमयातनाहीभोगोनी ॥ ८५ ॥
मांसमयशरीरआघवें ॥ दुर्गंधीचेंकुंडजाणावें ॥ तयेशीदोषदृष्टीचपहावें ॥ विवेकीपुरुषें ॥ ८६ ॥ तोविवेकआहेकै
सा ॥ नृपामीबोलेनकांहींसा ॥ तोऐकसावधमानसा ॥ निमिष्यएक ॥ ८७ ॥ श्लोक ॥ नचस्त्रीनपुमानेषनैवचायंन
पुंसकः ॥ अमूर्तःपुरुषःपूर्णोद्रष्टादेहीसजीविनः ॥ १५ ॥ टी० ॥ आत्मास्त्रीनापुरुषात्मक ॥ अथवानव्हेचिनपुंसक ॥
अमूर्तपुरुषपूर्णएक ॥ द्रष्टाजीववितादेही ॥ ८८ ॥ पुरीचाईशतोचिपुरुष ॥ द्रष्टेपणेंदेहींनिर्दोष ॥ सर्वांजीववीतयावि
शेष ॥ जीवऐसेंबोलिजे ॥ ८९ ॥ तस्मात्स्त्रीपुरुषांचेदेहींव्यापला ॥ परीआत्मात्यात्याऐसानाहींझाला ॥ आतांज
डाच्याठायींभावकल्पिला ॥ स्त्रीह्मणूनतेंऐकें ॥ ९० ॥ श्लो० ॥ यातन्वंगीमृदुर्बालामलपिंडात्मिकाजडा ॥ सानपश्य
तियत्किंचिन्नशृणोतिनजिघ्रति ॥ १६ ॥ टी० ॥ सूक्ष्मांगीतरुणीयुवती ॥ मृदुस्पर्शलागेत्वचेप्रति ॥ परीतिजडमल
रूपनिश्चिती ॥ तयेशीचळनतरीकैंचें ॥ ९१ ॥ तिशीपहाणेंऐकणेंनघडे ॥ आणिवासहीकदांनघेमडें ॥ याशीसुंदर
म्हणतातेवेडे ॥ जरीनानाशास्त्रेंअधीत ॥ ९२ ॥ श्लोक ॥ चर्ममात्रंतनुस्तस्याबुध्वात्यक्षस्वराघव ॥ याप्राणादधिका
सैवहंततेस्यात्घृणास्पदं ॥ १७ ॥ टी० ॥ चर्ममांसमयमात्रतनुजीची ॥ जाणूनविरहअवस्थातीची ॥ सहनचिकरींआ
ज्ञाआमुची ॥ अगाहेराघवा ॥ ९३ ॥ हीसीताजनकात्मजा ॥ प्राणाहूनअधिकमाझीभाजा ॥ हीतुझीतुजचिहोईल
लज्जा ॥ हंतइतिखेदें ॥ ९४ ॥ श्लो० ॥ जायंतेयदिभूतेभ्योदेहिनःपांचभौतिकाः ॥ आत्मायदेकलस्तेषुपरिपूर्णः

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

 सनातनः ॥ १८ ॥ टी० ॥ जरीभूतांपासूउद्भवली ॥ पंचभूतात्मककायासंचली ॥ आत्मयाचीहीतेथेंव्याप्तिझाली ॥
 परीआत्माजडनव्हे ॥ ९५ ॥ तयेकायेचेठायींआत्मा ॥ परिपूर्णएकचिदात्मा ॥ सनातनयारूपनामा ॥ स्पर्शला
चनाहीं ॥ ९६ ॥ सार्द्धश्लोक ॥ काकांतातत्रकःकांतःसर्वएवसहोदराः ॥ निर्मितायांगृहावल्ह्यांतदवच्छिन्नतांगतं ॥ १९॥ न
भस्तस्यांतुदग्धायांनकांचित्क्षतिमृच्छति ॥ टी० ॥ ऐसाआत्मापरिपूर्णअसतां ॥ तेथेंकेंचाभर्ताकेंचीकांता ॥ सहोदर
आणिमातापिता ॥ सर्वजनहीकेंचे ॥ ९७ ॥ जेवींछायार्थझोपडीनिर्मिली ॥ नभाचितितुकीचव्याप्तिझाली ॥ तीझों
पडीजळतांनाहींपावली ॥ दग्धताआकाशा ॥ ९८ ॥ श्लोक ॥ तद्वदात्मापिदेहेषुपरिपूर्णःसनातनः ॥ २० ॥ हन्यमाने
षुतेष्वेवसस्वयंनैवहन्यते ॥ टी० ॥ तेवींदेहाच्याठायींअसून ॥ आत्मापरिपूर्णसनातन ॥ देहजरीपावलामरण ॥ तरी
आत्मानमरे ॥ ९९ ॥ श्लो० ॥ हंताचेन्मन्यतेहंतुंहतश्चेन्मन्यतेहतम् ॥ २१ ॥ तावुभौनविजानीतोनायंहंतिनहन्यते ॥
॥ टी० ॥ मारिताह्मणेमीमारितों ॥ मरणारतोमीमेलोंह्मणतों ॥ तेउभयतांहीनेणतीआत्माजोतो ॥ नमारीआणिन
मरे ॥ १०० ॥ अथवादेहआत्माहेउभय ॥ मीमेलोंमारितोंनेणतीद्वय ॥ तस्मात्आलेंगेलेंहेंकाय ॥ विचारींराघ
वा ॥ १ ॥ श्लो० ॥ अस्मान्नृपतिदुःखेनकिंखेदस्यास्तिकारणं ॥ २२ ॥ स्वस्वरूपंविदित्वेदंदुःखंत्यक्त्वासुखीभ
व ॥ टीका ॥ देहअथवाआत्मयास्तव ॥ खेदकरणेंहेंसमूळवाव ॥ स्वस्वरूपजाणूनहेंदुःखसर्व ॥ टाकूनसुखीहोईं ॥ २ ॥
देहाकृतिमुळींचनाहीं ॥ तेथेंमीकोणअसेंपाहीं ॥ परिपूर्णआत्मासर्वदांही ॥ आपणनिजांगें ॥ ३ ॥ ऐसेंमुळींमीपणन
सतां ॥ माझेंकायअसेजरीदिसतां ॥ तस्मात्कैंचाराघवकैंचीसीता ॥ खेदकर्ताहीकोण ॥ ४ ॥ कैंचारावणकोणेनेली॥
सांडींहेनामरूपाचीभुली ॥ ब्रह्मात्मअभेदतासंचली ॥ कवणेहीकाळीं ॥ ५ ॥ अगारामातूंपूर्णब्रह्म ॥ हाझालाचिना

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हींजगद्भ्रम ॥ हेंतुजठाउकोंचिआहेनिःसीम ॥ मीकायसांगूं ॥ ६ ॥ अगाज्ञानाञ्जलियावरी ॥ देहासगटसर्वेजगाआ
लीमारी ॥ कींबुडालींआवरणोदकींसारीं ॥ परीआत्मास्थितिदंडळूनये ॥ ७ ॥ ऐसेंअगस्तीचेबोलूऐकिले ॥ किंचित्
मुखाकडेपाहूनहास्यकेलें ॥ इतुकेंचियेथेंरामेंसुचविलें ॥ कींमीबोलिल्याऐसाचिअसें ॥ ८ ॥ परीम्यावरीवरीखेददा
विला ॥ यास्तवअगस्तीसंबोखीमजला ॥ परंतुगुप्तहेतुयानाहींकळला ॥ माझियेअंतरींचा ॥ ९ ॥ येणेंजोकथिलाविचारु॥
जोकोणीतत्परऐकेनरु ॥ तयाशीहोयमुक्तीचाअधिकारु ॥ ज्ञानाशीपात्र ॥ १० ॥ फिटावयाजीवाचीभ्रांति ॥ व्हावीश्रीशि
वगुरूचीप्राप्ति ॥ तयाचेउपदेशेंअभेदभक्ति सदृढहोयजीवा ॥ ११ ॥ जेधवांदृढअपरोक्षज्ञान ॥ तेधवांचिमरेअहंकाररराव
ण ॥ स्वानुभूतिसीताअखंडपूर्ण ॥ मन्निष्ठमजभेटे ॥ १२ ॥ तस्मात्माझियामनींचाहेतू ॥ तोअगस्तीशीप्रगटवूंसमस्तु ॥
तरीचउपायाचबोलेलमातु ॥ शिवसद्गुरुप्राप्तीच्या ॥ १३ ॥ श्लोक ॥ श्रीरामउवाच ॥ मुनेदेहस्यनोदुःखंनैवचेत्पर
मात्मनः ॥ २३ ॥ सीतावियोगदुःखाग्निर्मांभस्मीकुरुतेकथं ॥ टी० ॥ हेमुनेदुःखनाहींदेहाशी ॥ आणिनाहींब्रह्मणशीआ
त्मयाशी ॥ सीतावियोगाग्नीतरीमजशी ॥ केवींभस्मकरीतसे ॥ १४ ॥ अहोमुनिरायाऐकावें ॥ माझेंअंतरींचेंगुह्यजा
णावें ॥ मजशीसीतावियोगाचेंदुःखनव्हे ॥ रावणेंनेलीम्हणोनि ॥ १५ ॥ मीपूर्णब्रह्मसनातन ॥ अभेदरूपमायाविही
न ॥ तेथेंहोतांचिमायास्फुरण ॥ ईश्वरत्वमजआलें ॥ १६ ॥ पुढेंचारिखाणीहोतांउत्पन्न ॥ त्यांतजीवरूपेंप्रवेशलोंआ
पण ॥ तेणेंस्वस्वरूपाचेंझालेंअज्ञान ॥ मद्रूपजीवाशी ॥ १७ ॥ स्वस्वानुभवकुबेराकारणें ॥ नरतनुलंकाकेलीनि
र्माण ॥ तेथेंराहिलाअहंकाररावण ॥ दवडूनियांतया ॥ १८ ॥ आपणसहपरिवारेंबळावला ॥ देहलंकापुरीचाराजा
झाला ॥ हरूननेलेंस्वानुभूतिसीतेला ॥ मन्निष्ठअसूनी ॥ १९ ॥ आणिजीवाशीअतिपीडिलें ॥ जन्ममरणरूपेंभ्रमवि

CC-0.Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

